अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २५ ऑक्टोबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## दक्षिण आफ्रिकेचा बांगलादेशवर १४९ धावांनी विजय




✔ **मुंबई :** दक्षिण आफ्रिका विरुद्ध बांगलादेश या दोन संघांमध्ये विश्वचषक २०२३ स्पर्धेतील २३वा सामना मुंबई येथील वानखेडे स्टेडिअम येथे खेळला गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने बांगलादेशचा १४९ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करम याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. त्याचा हा निर्णय क्विंटन डेकॉक आणि हेनरिक क्लासेन यांनी सार्थ ठरवत दोघांनी तुफानी खेळी केली. खराब सुरुवातीनंतर सलामीवीर क्विंटन डी कॉक याने आपला शानदार फॉर्म कायम राखला. त्याने या फॉर्मचा फायदा उठवत स्पर्धेतील आपले तिसरे शतक पूर्ण केले मात्र, त्याचे द्विशतक हुकले त्याने १७४ धावा केल्या. त्याच्या या खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने बांगलादेशसमोर ३८३ धावांचे अवघड असे लक्ष्य ठेवले आहे. एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेचे फलंदाज जबरदस्त फॉर्ममध्ये आहेत. या संघाने एकदिवसीय क्रिकेटमध्ये सलग सात सामन्यांमध्ये ३०० हून अधिक धावा केल्या आहेत. आफ्रिकेने एकदिवसीय विश्वचषकातील सर्वोच्च धावसंख्याही केली आहे.

# ‘गुद्दा-गुद्दी’चे सीमोल्लंघन

## धगधगत्या मशालीतून ‘खोक्याची लंका’ दहन करेन

तुमची खोक्याची लंका दहन करणारी धगधगती मशाल निखारा माझ्याकडे आहे, अशा शब्दात शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटावर हल्लाबोल केला. रावण हा शिवभक्त होता. तरीही त्याला रामाला मारावे लागले....वध करावा लागला.कारण तो माजला होता. ज्याप्रमाणे हनुमानाने सोन्याची लंका दहन केली,तशीच तुमची खोक्याची लंका दहन करणारी धगधगती मशाल माझ्याकडे आहे,असा खणखणीत इशारा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाला दिला.




उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी शिवाजी पार्कवरील दसरा मेळाव्यातील भाषणात भाजप आणि शिंदे गटावर टीकेची तोफ उडवली. ५७ वर्षे झाली तरीही शिवसेनेची दसरा मेळाव्याची परंपरा आपण मोडली नाही. यापुढेही मोडणार नाही. ज्यांनी मोडता घालण्याचा प्रयत्न केला त्यांना मोडीत काढून आपण पुढे चाललो आहोत. आपला मेळावा झाल्यानंतर आपण खोकासुराचं दहन करणार आहोत. रामाने रावणाचा वध का केला? कारण मी ऐकलं आहे की रावणही शिवभक्त आहे. तरीही रामाला त्याला मारावं लागलं कारण रावण माजला होता. रावणाने सीतेला पळवलं होतं. त्याचप्रमाणे आपली शिवसेना पळवण्याचा प्रयत्न होतो आहे. एक खबरदारी त्यांनी घेतली आहे की त्यांनी आपला धनुष्यबाणही चोरला आहे. असं म्हणत उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदे आणि चाळीस आमदारांवर टीका केली आहे. ठाकरे यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचे अभिनंदन केले. जरांगे यांनी धनगरांच्या आरक्षणाच्या मुद्याला पाठिंबा दिला. जातीमध्ये फूट पाडण्याचा भाजपचा डाव उधळून लावण्याचा प्रयत्न केल्याबद्दल जरांगे यांचे अभिनंदन करत असल्याचे ठाकरे यांनी म्हटले.

### भुसे गोट्या खेळत होते काय?

सुषमा अंधारे यांनी शिवसेना दसरा मेळाव्यातून टीकास्त्र सोडले. अंधारे ह्या देवेंद्र फडणवीस आणि दादा भुसे यांच्यावर कडाडल्या. त्यांनी नाशिक ड्रग्ज प्रकरणावरुन सरकारला घेरले. १० ऑक्टोबरला नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणात ड्रग्स जप्त केलं. नाशिकमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात ड्रग्स सापडतय तर पालकमंत्री काय करतायत. नाशिकला एवढ्या कोटींचा साठा मिळत असताना नाशिकचा पालकमंत्री गोट्या खेळतोय का, असे म्हणत भुसेंवर टीका केली.

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सुरु केलेल्या दसरा मेळाव्यात एकेकाळी परखड विचार होता. हा मेळावा म्हणजे धगधगते कुंड होते. आज शिवसेना फुटली दोन गट पडले. गतवर्षीपासून दोन मेळावे होऊ लागले. या मेळाव्यामधून विचार संपला आणि एकमेकांवर चिखलफेक करण्याचे उद्योग सुरु झाले. एकमेकांचे वाभाडे काढले जात आहेत. टीका-प्रतिटीका असावी, पण वैचारीक पातळी सोडून एकमेकांचे चारित्र्य हरण केले जात आहे. दोन्ही गटाचे मेळावे म्हणजे गुद्दा-गुद्दीचे सिमोल्लंघन ठरु लागले आहे.**

## उद्धव ठाकरेंनी सत्तेसाठी निर्लज्जपणाचा कळस गाठला

आम्ही हिंदुत्वासाठी सत्ता सोडली, हे सत्तेसाठी लाचार झाले, बाळासाहेबांनी ज्यांना आपल्याजवळ उभं करून घेतलं नाही, त्यांच्यासोबत हे आज गेले, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आझाद मैदानावरील दसरा मेळाव्यात ठाकरे गटावर केली. ‘आम्हाला एक फूल दोन हाफ’ म्हणणारे हे ‘एक फूल एक हाफ’ करत कधीही शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन करतील,असे भाकितही त्यांनी वर्तवले. उद्धव ठाकरे हे महागद्दार आहेत, त्यांनी निर्लज्जपणाचा कळस गाठला आहे,अशी घणाघाती टीका शिंदे यांनी केली.




सावरकरांचा अपमान ज्यांनी केला तो मणिशंकर अय्यर याला बाळासाहेबांनी जोडे मारण्याचे काम केलं आणि त्याच काँग्रेसचे जोडे आज हे लोक उचलत आहेत. हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह आमच्याकडे आल्यानंतर यांनी बँकेकडे ५० कोटी रुपये मागितले. बँकेने त्याला नकार दिला. त्यानंतर निर्लजाप्रमाणे त्यांनी माझ्याकडे पैसे मागितले. आमच्यावर ५० खोक्यांचे आरोप करता आणि आमच्याकडेच ५० कोटींची मागणी करता. तुमचे प्रेम हे बाळासाहेबांच्या विचारावर नाही तर पैशावर आहे. त्यामुळे मी एका क्षणाचाही विचार न करता ते पैसे दिले.

पवारांकडे दोन माणसे पाठवले आणि उद्धव ठाकरे यांच्या नावाची शिफारस करा असे त्यांना सांगितलं. २००४ सालापासून त्यांना ही इच्छा होती, पण जुगाड काही लागत नव्हता. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीनंतर लगेच टूनकण उडी मारली आणि तिकडे खुर्चीवर जाऊन बसले. त्यांच्या चेहऱ्यावर जाऊ नका, पोटातले पाणी पण हलू दिलं नाही. शेवटपर्यंत त्यांनी समजू दिलं नाही. सितेचं हरण करण्यासाठी रावणाने साधूचं रूप घेतलं होतं. त्याचप्रमाणे उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्रीपदासाठी संधीसाधू बनले.

### टांगा पलटी, घोडा फरार...

राज ठाकरे यांच्याबद्दल धर्मवीर आनंद दिघेंनी दोन शब्द चांगले बोलले, लगेच यांच्या पोटात दुखलं. त्यांचे पंख छाटण्याचं काम सुरू केलं, मी साक्षीदार आहे. त्यांचा अपघात झाला, त्यावेळी आले नाहीत. त्यांच्या मृत्यूनंतरही आले नाहीत. त्यांच्या मृत्यूनंतर मला विचारलं की आनंद दिघेंची संपत्ती कुठे आहे. उद्धव ठाकरेंनी जर ठरवलं तर त्याचा काटा काढतातच. अशा अनेक गोष्टींचा मी साक्षीदार आहे. या एकनाथ शिंदेला खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा प्रयत्न केला गेला. मला लक्षात आल्यानंतर त्यांचाच ‘टांगा पलटी अन् घोडे फरार’ केला.

## पिंपरी येथे द्राक्षांची झाडे तोडून २५ लाखांचे नुकसान

✔ **वैराग :** पूर्व वैमनस्यातून मावस भावाच्या शेतातील ५०० द्राक्षाचे झाडे तोडून २० ते २५ लाखाचे नुकसान केल्याची घटना पिंपरी (ता.बार्शी) येथे नुकतीच उघडकीस आहे. या प्रकरणात वैराग पोलिसांनी शेतकऱ्याच्या मावस भावासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात भाऊसाहेब बळीराम काटमोरे (वय- ३०, पिंपर, बार्शी) या शेतकऱ्यांनी पोलिसात फिर्याद दिली. पोलिसांनी त्यांचा मावस भाऊ रुपेश गव्हाणे (हिंगणी), प्रशांत जाधव (श्रीपत पिंपरी) या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. या दोघांनी मिळून शुक्रवारी ६ ते दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजेपर्यंत त्यांच्या शेतातील द्राक्षाची झाडे तोडून नुकसान केले, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.



सोलापूरः सोलापुरात मंगळवारी मोठ्या उत्साही वातावरणात दसरा सण साजरा करण्यात आला. यावेळी हजारो सोलापूकरांनी पार्क चौकातील शमी वृक्षास सिम्मोलंघन केले. दुसऱ्या छायाचित्रात धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त आर.जी. ग्रुपच्यावतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. त्यावेळी लेझीमचे उत्कृष्ट सादरीकरण करताना कार्यकर्ते दिसत आहेत.

## कुर्डुवाडीत जेसीबीच्या धक्क्याने कामगाराचा मृत्यू

✔ **कुर्डूवाडी :** जेसीबीच्या खाली बसून ग्रीसिंग करताना बकेटचा धक्का लागून कामगार गंभीर जखमी होऊन मरण पावला. ही दुर्घटना कुर्डू (ता.माढा) येथील पायदान यांच्या गाळ्यासमोर घडली.

शंकर भागवत रणदिवे (वय-३३) असे मयताचे नाव आहे. तो कामगार (एम.एच.४५-ए. डी.-६७२७) जेसीबीच्या बकेट खाली बसून ग्रीसिंग करत होते. त्यावेळी ड्रायव्हरने हलगर्जीपणाने हायड्रोलिक लिव्हर ऑपरेट केला. त्यावेळी लोखंडी बकेटचा धक्का लागल्याने रणदिवे हा गंभीर जखमी होऊन मरण पावला. या घटनेची फिर्याद मयताचे बंधू गणेश रणदिवे यांनी कुर्डूवाडी पोलिसात दिली. पोलिसांनी जेसीबीचा चालक सुरेश माणिक कापरे (ता. कुर्डू) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तपास सहाय्यक फौजदार गुटाळ करीत आहेत.

## सोलापूर लोकसभेसाठी प्रणितीच उमेदवार

### ▸ जे करता येईल, ती मदत करेन : शिंदे

✔ सुराज्य/सोलापूर





विजयादशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनादिवशी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी महत्त्वाचे विधान केले. औचित्य साधून शिंदे यांनी मोठी घोषणा केली.

सोलापूर लोकसभा मतदार संघातून काँग्रेसची उमेदवारी आ.प्रणिती शिंदे यांनाच असेल. त्यामुळे मला जे करता येईल, ती मदत मी करणार आहे. मंगळवारी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ते पार्क चौकातील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला शिंदे यांनी अभिवादन केले. त्यानंतर पत्रकारांनी त्यांना गाठले. सोलापूर लोकसभेच्या उमेदवारीसंदर्भात ते म्हणाले, मी राजकारणातून निवृत्ती जाहीर केली आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीसाठी प्रणिती शिंदे याच काँग्रेसच्या उमेदवार असतील. त्यांनी सोलापुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकला भेट दिली. दरवर्षी आम्ही बाबासाहेबांना अभिवादनासाठी येत असतो. मात्र योगायोगाने मी आज सोलापुरात आहे. त्यामुळे आज बाबासाहेबांना अभिवादन करायला आलो.

## लवंगमध्ये चोरट्यांनी घर फोडले; सव्वा लाखांचे दागिने लंपास

✔ सुराज्य/सोलापूर



लवंग (ता.माळशिरस) येथे राहणाऱ्या गोरख गणपत वाघ यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील रोख रकमेसह १ लाख ३५ हजार रुपये किंमतीचे दागिने पळवले.

गोरख वाघ हे घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. दरम्यान, चोरट्यांनी संधी साधून घरात घुसले. कुलूप तोडून कपाटातील २० हजार रुपये रोख आणि सोन्याचे दागिने चोरून नेले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी घरफोडीची फिर्याद अकलूज पोलिसात दाखल केली.

## शिक्षण विभागाला शिक्षक आमदारच वैतागले

### ▸ आसगावकरांचा आंदोलनाचा इशारा

✔ सुराज्य/पुणे

शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी शालार्थ आयडीच्या प्रश्नावर पुणे येथील शिक्षण आयुक्तांच्या कार्यालयासमोर दि. ३० ऑक्टोबरपासून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

सोलापूर, पुणे जिल्ह्यांतील आयडीचा प्रश्न गंभीर बनत आहे. शिक्षकांना शालार्थ आयडी मिळायला नको, म्हणून अधिकारी जाणूनबुजून दिरंगाई करत आहेत. याबाबत अधिकारी यांच्याकडून होणाऱ्या निष्काळजीपणाच्या विरोधात आंदोलन करणार आहे. या आंदोलन काळात होणाऱ्या गंभीर परिणामाला आपण जबाबदार राहाल, अशा आशयाचे निवेदन आ. आसगावकर यांनी शिक्षण आयुक्तांना दिले आहे. त्यामुळे



आता आ. आसगावकर यांच्या मागणीवर प्रशासन काय निर्णय घेतील, हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

टप्पा अनुदानावरील शिक्षकांना लवकरात लवकर शालार्थ आयडी मिळवून त्यांची यंदाची दिवाळी गोड व्हावी, यासाठी आपला पाठपुरावा सुरू आहे. पण, शिक्षण विभागातील अधिकारी याबाबत सकारात्मक नसल्याचे चित्र दिसून येत आहे, असेही ते म्हणाले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




बाबा, आता भ्रष्टाचार संपला ना ?

कल्याण
223-75-799

मुंबई
-----

## तुळजाभवानी देवीचे सीमोल्लंघन उत्साहात

### ▸ पौर्णिमेपर्यंत देवीची श्रमनिद्रा

✔ सुराज्य/धाराशिव

**पंचज्ञानेंद्रीयांना प्रफुल्लीत करणारा वाद्यांचा ठेका, कुंकवाची मनसोक्त उधळण, आई राजा उदो-उदोचा गगनभेदी जयजयकार करीत तुळजाभवानी मातेचे सीमोल्लंघन मंगळवारी मोठ्या भक्तीमय वातावरणात पार पडले. सीमोल्लंघनानंतर आता पौर्णिमेपर्यंत तुळजाभवानी देवीची श्रमनिद्रा असणार आहे. पौर्णिमेला सोलापूरच्या मानाच्या काठ्यांसह तुळजाभवानी मंदिरात पुन्हा आई राजा उदो-उदोचा पुन्हा उदोकार घुमणार आहे.**



सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास नगरहून आलेला तुळजाभवानी देवीचा मानाचा पलंग शहरात दाखल झाला. तुळजापूर शहरातील पारंपरिक मार्गावरून पलंगाची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. अग्रभागी पोत घेतलेल्या महिला आराधी भाविकांचे लक्ष वेधून घेत होत्या. पहाटे साडेचार वाजण्याच्या दरम्यान पलंग पालखी तुळजाभवानी देवीच्या मंदिरात दाखल झाली. अभिषेकानंतर तुळजाभवानी देवीच्या मूर्तीला १०८ साड्यांचे दिंड बांधण्यात आले. त्यानंतर मोठ्या भक्तिमय वातावरणात धुपारती झाली. धुपारतीनंतर तुळजाभवानी देवीचे माहेर अशी ख्याती असलेल्या नगरहून आलेल्या मानाच्या पलंग पालखीत देवीची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. पिंपळाच्या पारावर पालखी टेकवल्यानंतर पारंपारिक प्रथेप्रमाणे तुळजाभवानीचा जयघोष करीत संबळाच्या निनादात सर्व विधी करण्यात आला.

मंदिरातील या सर्व धार्मिक कार्यक्रमास तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, मंदिर समितीचे विश्वस्त आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, विश्वस्त तथा उपविभागीय अधिकारी योगेश खरमाटे, तहसीलदार सोमनाथ माळी यांच्यासह तुळजाभवानी देवीचे महंत, उपाध्ये, भोपे, पाळीकर पुजारी मंडळाचे पदाधिकारी भाविक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

### सीमोल्लंघनासाठी देवी भाविकांबरोबर

तुळजाभवानी देवीची मूर्ती चल मूर्ती आहे. आपले सिंहासन सोडून सीमोल्लंघन करण्यासाठी तुळजाभवानी देवी भाविकांच्या बरोबर गाभाऱ्याच्या बाहेर येते. सीमोल्लंघनानंतर पुन्हा पौर्णिमेपर्यंत देवीची श्रमनिद्रा असते. देवीच्या मूर्तीला इजा होऊ नये म्हणून १०८ साड्या परिधान केल्या जातात. पलंग पालखीच्या मिरवणुकीनंतर प्रथेप्रमाणे पलंग तोडून पालखीचे होमात विसर्जन करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्या हजारो भाविकांनी कुंकू आणि फुलांची उधळण करीत जगदंबेच्या नावाचा जल्लोष केला.

# ठिणग्या टाकण्याचे उद्योग

राज्यात मराठा आरक्षणाच्या आक्रमक मागणीवरून पुन्हा सामाजिक व राजकीय वातावरण तापू लागले असतानाच, त्यावर सरकारी जाहिरातीतून आर्थिक आरक्षण कसे फायदेशीर व उपयुक्त आहे, असे सांगण्याचा आणि वातावरण थंड करण्याचा प्रयत्न सुरू झाल्याचे दिसत आहे. मात्र त्यावरूनही पुन्हा वादाच्या ठिगण्या उडू लागल्या आहेत. भारतीय समाजरचनेत बहिष्कृत वा अस्पृश्य गणला गेलेला जातसमूह किंवा वर्ग आणि जंगल, दुर्गम डोंगर/दऱ्यांत राहणारा आदिवासी वर्ग यांना अनुक्रमे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग म्हणून सामाजिक आरक्षणाची राज्यघटनेत तरतूद करण्यात आली. या समाजाला मुख्य प्रवाहात आणून समानतेची संधी व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी शिक्षण व नोकऱ्यांमध्ये त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात (ते कमीअधिक असले तरी) आरक्षणाचे तत्त्व लागू करण्यात आले. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १५ व १६ अनुसूचित जाती व जमातीला सामाजिक आरक्षणाचा अधिकार बहाल करते. राज्यघटनेत सुरुवातीला अनुसूचित जाती व जमातींसाठी सामाजिक आरक्षणाची व्यवस्था केली असली तरी, ३४० व्या अनुच्छेदाचा समावेश करून सामाजिक व शैक्षणिक मागासलेल्या घटकांच्या उन्नतीसाठी आरक्षणाची तरतूद करण्याचा आधीच मार्ग आखून ठेवला होता. त्याचाच आधार घेऊन मंडल आयोगाच्या माध्यमातून देशातील इतर मागासवर्गीयांना शिक्षण व शासकीय नोकऱ्यांत २७ टक्के आरक्षण लागू करण्यात आले. अर्थात अनुसूचित जाती, जमाती व नंतर ओबीसींना आरक्षण लागू करण्यात आले तरी, त्याचा मूळ आधार




हा सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण होता, आणि त्या-त्या जातसमूहाच्या शैक्षणिक व सामाजिक मागासलेपणाच्या आधारावर हे आरक्षण देण्यात आले. घटनेतील आरक्षणाशी संबंधित अनुच्छेद १५, १६ वा ३४० यामध्ये कुठेही आरक्षणासाठी आर्थिक मागासलेपणाचा आधार घेण्याची तरतूद नाही. शिक्षितांची वाढती संख्या व वाढती बेरोजगारी अशा वातावरणात आरक्षित वर्ग व बिगर आरक्षित वर्ग असा संघर्ष देशात सुरू झाला. मंडल आयोग लागू होईपर्यंत आणि झाल्यानंतरही खुल्या प्रवर्गाचा जातीवर आधारित आरक्षणाला विरोध होताच. मात्र हा विरोध करता करता, उच्चवर्णीयांमधील काही जातींनी जातीच्या आधारावरच आरक्षणाची मागणी करायला सुरुवात केली. आरक्षणावरून संघर्ष सुरूच राहिला, परंतु त्याची विरोधाकडून आरक्षणाच्या मागणीकडे दिशा वळली. मंडल आयोगाने ओबीसींना दिलेल्या आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केल्यानंतर पुढल्या काळात, आर्थिक निकषावर आरक्षणाची मागणी होऊ लागली. जात हा घटक दूर करून आर्थिक दुर्बलता या आधारावर आरक्षण दिल्यास सर्वच गरिबांना त्याचा लाभ मिळेल, असा युक्तिवाद केला जाऊ लागला. त्याची केंद्रातील पी.व्ही. नरसिंह राव सरकारने दखल घेऊन मंडलमुळे तापलेले सामाजिक वातावरण शांत करण्यासाठी काही टक्के आर्थिक आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला. परंतु पुढे सर्वोच्च न्यायालयात हा निर्णय टिकू शकला नाही, कारण घटनेत आर्थिक निकषावर आरक्षण देण्याची तरतूदच नव्हती. त्यातच इंद्रा साहनी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींच्या आरक्षणावर शिक्कामोर्तब करताना आरक्षणाची ५० टक्के मर्यादा घालून दिली, तीही ओलांडायची तर घटनादुरुस्तीच हवी. अखेर २०१९च्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने १०३ वी घटनादुरुस्ती करून आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, पण तो आर्थिक दुर्बल घटकांसाठी. या घटनादुरुस्तीने आर्थिक दुर्बल घटकांना (ईडब्ल्यूएस) शिक्षण व शासकीय नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण देण्यात आले. शिक्षणातील आरक्षणामधून अल्पसंख्याक शिक्षणसंस्थांना वगळण्यात आले आहे. त्याव्यतिरिक्त शासकीय, खासगी अनुदानित, विनाअनुदानित अशा सर्व व्यवस्थापनांच्या शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेशासाठी आर्थिक दुर्बल घटकांना आरक्षण लागू करण्यात आले आहे. या घटनादुरुस्तीने आरक्षणाची मर्यादाही वाढवतानाच, सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या निकषाबरोबर 'आर्थिक दुर्बलता' या नव्या निकषाचाही समावेश करण्यात आला. हे वाढीव १० टक्के आरक्षण 'खुल्या वर्गातील सर्वच आर्थिक दुर्बल घटकांसाठी' लागू आहे. सर्वोच्च न्यायालयाने ही घटनादुरुस्ती घटनाविरोधी ठरवण्यास नकार दिला. परंतु आरक्षणाच्या मूळ हेतूला आणि घटनेच्या मूलभूत तत्त्वाला हे आरक्षण धरून आहे का,असा प्रश्न उकरून काढत काही बिनडोक्याचे विचारवंत या आरक्षणाला बाधा आणू पहात आहेत. इथे घटनेपेक्षा कुणी मोठा नाही,हे लक्षात ठेवायला हवे.

अर्थ

# आर्थिक साक्षरतेसमोरील आव्हाने अन् उपाय

आपल्या प्रत्येकालाच लवकरात लवकर अर्थसंपन्न व्हावेसे वाटते आणि तसा प्रत्येकाचाच तो प्रयत्न असतो. स्टीव्ह जॉब्स, बिल गेट्स, मार्क झुकेरबर्ग, मुकेश अंबानी, नारायण मूर्ती, अंबानी, टाटा असे सगळे उद्योजक व धनवान व्यक्ती अनेकांचे आयडॉल असतात. अशा बुद्धिमान, कष्टाळू व चतुर व्यक्तींकडून शिकण्यासारखे खूप काही असते, परंतु अर्थसाक्षरतेचे काही मूलभूत नियम पाळले तर आपणही समृद्ध व विविध आर्थिक जबाबदाऱ्या यथायोग्य पार पाडून सुखासमाधानाचे आयुष्य नक्कीच जगू शकतो. लाखो भारतीयांनी ते यशस्वीपणे करून दाखवले आहे, परंतु आपले त्यांच्याकडे लक्ष नसते किंवा आपल्याला त्यांचे नायकत्व समजत नाही. असे दुर्लक्षित नायक कदाचित तुमच्या शेजारी सोसायटीत, गल्लीत राहत असतील, तुमच्या नातेवाईकांत, मित्रांमध्ये, परिचितांमध्ये असे लोक असतील आणि तुम्हाला त्यांच्या यशाचा पत्ताच नसेल, ते नेमके काय करतात आणि काय करणे टाळतात हे समजून घेणे म्हणजेच अर्थसाक्षर होणे.

अर्थसंपन्न कसे व्हायचे व त्यासाठी काय काय करावे लागते याची आर्थिक साक्षरता बऱ्याच लोकांकडे नसते आणि त्यामुळे बरेच लोक अर्थसंपन्न होत नाहीत. अर्थसंपन्न होण्यासाठी आर्थिक साक्षरता हा फार महत्त्वाचा भाग आहे, परंतु अशी आर्थिक साक्षरता मिळवण्यासाठी खूप सारी आव्हाने आहेत. त्यासाठी खूप सारी आर्थिक शिस्त, संयम लागतो. त्या आव्हानांवर उपाय काय आहेत याचा विचार आपण आज करणार आहोत.

**स्पष्ट आर्थिक उद्दिष्टे नसणे :** असा विचार करा की तुम्हाला पुण्याला जायचे आहे, परंतु तुम्ही निघालात आणि तुमच्या घरासमोरील एका सर्कललाच दिवसभर चकरा मारत आहात, तर तुम्ही पुण्याला पोहचणार का? असेच अर्थसाक्षरतेबद्दल असते. आपल्याला आपले उद्दिष्टच माहीत नसते की आपल्याला कुठे जायचे आहे आणि कशासाठी जायचे आहे. गुंतवणुकीबाबतही तसेच आहे. तुमच्याकडे स्पष्टपणे लिखित उद्दिष्टे नसल्यास ती पूर्ण कशी होणार.

जसे की गुंतवणुकीचे लक्ष्य किंवा गुंतवणुकीचा उद्देश काय आहे हे जर तुम्ही ठरविले नाही तर तुम्ही आर्थिकदृष्ट्या यशस्वी होण्याची शक्यता नाही. म्हणूनच तुम्ही तुमचे आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी धोरण आखण्यापूर्वी तुम्ही गुंतवणूक का करीत आहात किंवा बचत का करीत आहात, तुम्ही किती बचत करण्याची योजना आखत आहात, तुम्ही किती काळासाठी गुंतवणूक/बचत करीत आहात इत्यादी गोष्टी शोधणे आवश्यक आहे. आपण हेदेखील लक्षात ठेवले पाहिजे की स्वतःची आर्थिक उद्दिष्टे ठरविताना आपण वास्तववादी असणे आवश्यक आहे. जर तुम्ही स्वतःसमोर अशक्य उद्दिष्टे ठेवली तर तुम्ही स्वतःला अपयशाकडे न्याल. तुमचे उत्पन्न किती आहे व पुढे त्यात किती वाढ होणार आहे याचा विचार करूनच आर्थिक उद्दिष्ट ठेवले पाहिजे. तुमच्या वयानुसार तुमचे आर्थिक उद्दिष्ट हे वेगवेगळे असते. बरेच लोक उत्पन्नातून बचत तर करतात, पण कशासाठी बचत आणि गुंतवणूक करायची हेच ठरलेले नसते.



**खर्चावर नियंत्रण ठेवण्यात असमर्थता :** तुमच्या उत्पन्नाच्या सवयीपेक्षा तुमच्या खर्च करण्याच्या सवयीच तुम्हाला लवकर अर्थसंपन्न बनवतात. आर्थिकदृष्ट्या यशस्वी होण्यासाठी हा आतापर्यंतचा सर्वात मोठा अडथळा आहे. आवेगपूर्णपणे खर्च करणे हा तुमच्याकडे असलेल्या कोणत्याही आर्थिक योजनांचा नाश करण्याचा एक निश्चित मार्ग आहे. तुम्ही खर्च करण्यापूर्वी पुरेसा विचार केला नाही किंवा योजना आखली नाही, तर तुमची आर्थिक उद्दिष्टे कायमच चुकतील. दुर्दैवाने जगात कोणतेही असे मशीन नाही की जे तुम्हाला तुमची खर्च करण्याची इच्छा नियंत्रित करू शकेल. त्यामुळे स्वतःवर नियंत्रण ठेवावेच लागेल. खर्च करण्याच्या तुमच्या आवेगावर नियंत्रण ठेवण्याचा एक संभाव्य मार्ग म्हणजे कुठलाही खर्च करताना तुमची इच्छा आणि गरज यातील फरक ओळखणे. त्यासाठी एक सोपा प्रश्न स्वतःला विचारणे की या खर्चाशिवाय मी जगू शकतो का? याचे उत्तर जर होय असेल तर ती तुमची इच्छा आहे आणि उत्तर नाही असेल तर ती तुमची गरज आहे. तुम्ही जर बचत करीत असाल तर तुम्ही यशाच्या मार्गावर आहात.

**गुंतवणूक रिटर्न्स (परतावा) आणि टॅक्सेस :** आपल्या यशाची इतरांशी तुलना करणे हा मानवी स्वभाव आहे आणि जर तुम्हाला असे आढळले की तुमचे परतावे तुमच्या मित्राच्या किंवा कुटुंबातील सदस्यांच्या तुलनेत कमी आहेत, तर तुम्ही तुमची गुंतवणूक बदलू शकता. महागाई दर आणि तुमच्या गुंतवणुकीचा परतावा याचे गणित समजून घेणे आवश्यक आहे. आज एखादी वस्तू घ्यायला १०० रुपये लागत असतील तर ती वस्तू १० वर्षांनंतर त्याच किमतीला मिळणार नाही. त्या वस्तूची किंमत वाढलेली असेल. त्या महागाईवाढीच्या दरापेक्षा तुमच्या गुंतवणुकीवरील परतावा हा नेहमी जास्तच हवा. दुसरी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अतिपरताव्याच्या लोभापायी कुठेही गुंतवणूक करू नये. बाजारातील अनेक फसव्या गुंतवणूक योजनांमध्ये अनेकांचे लाखो-करोडो रुपये बरबाद झाले आहेत हे समजून घ्यावे. गुंतवणूक परतावा काढताना संभाव्य टॅक्सेसचा विचार होणे आवश्यक आहे. रिअल इस्टेट गुंतवणूक करताना हा विचार जरूर करावा. जेवढे टॅक्सेस जास्त तेवढा तुमचा गुंतवणूक परतावा कमी असतो.

**जास्त कर्ज घेणे :** कर्ज घेणे आता फार सुलभ झाले आहे, परंतु कर्जाची परतफेड करून तुमच्याकडे बचत आणि गुंतवणूक यासाठी काही उरत नसेल तर कर्ज घ्यायचे की नाही याचा निर्णय फार महत्त्वाचा आहे. आपले उत्पन्न भविष्यात खूप वाढेल या चुकीच्या आशेपायी भरपूर कर्ज काढले जाते व नंतर त्याची परतफेड होत नाही. वर स्वतःला विचारलेला प्रश्न परत विचारा की मी गरजेसाठी कर्ज काढत आहे की फक्त माझ्या इच्छा, हौसमौज करण्यासाठी कर्ज काढत आहे. तुमचे उत्पन्न, तुमचे वय, तुम्हाला कर्जाची किती डाऊन पेमेंट येणार आहे, कर्जाचा हप्ता किती येणार आहे, कर्जाचा कालावधी किती असणार आहे, कर्जाचा व्याजदर किती असणार आहे या सर्वांचा अभ्यास करूनच कर्ज घ्यायचे की नाही हे ठरवायचे आहे. तुमचे येणारे सर्वच उत्पन्न जर कर्ज फेडण्यात जाणार असेल तर गुंतवणुकीसाठी तुमच्याकडे काहीही उरणार नाही. तसेच एक कर्ज फेडण्यासाठी दुसरे कर्ज घेण्याची वेळ येत असेल तर तुमचा कर्ज निर्णय चुकला असेच म्हणावे लागेल. घसारा होणाऱ्या मालमत्तांसाठी कर्ज घेताना योग्य विचार होणे गरजेचे असते, जसे की कार लोन, मशिनरी लोन इत्यादी.

**आपत्कालीन परिस्थितीसाठी अपुरे नियोजन :** आणीबाणी ही जीवनाची वास्तविकता आहे. त्यासाठी योग्य नियोजन न केल्याने तुम्हाला तुमची आर्थिक उद्दिष्टे साध्य करता येणार नाहीत. आणीबाणीसाठी आर्थिकदृष्ट्या तयार राहण्यासाठी दोन महत्त्वाच्या गोष्टी करणे आवश्यक आहे. पुरेसा आरोग्य विमा घेणे आणि आपत्कालीन निधी तयार करणे. तुमच्याकडे पुरेसा आरोग्य विमा असल्यास वैद्यकीय आणीबाणीच्या परिस्थितीत तुमची बँक शिल्लक शून्य होणार नाही. आरोग्य आपत्कालीन परिस्थिती विम्याने हाताळली जाऊ शकते, परंतु नोकरी गमावण्यासारख्या इतर आपत्कालीन परिस्थितीही येऊ शकतात.

वरील काही अडचणी व त्यावरील उपाय नीट समजून घेतले तर आपणही लवकर अर्थसंपन्न होऊ शकतो. आर्थिक शिक्षण म्हणजे फक्त आर्थिक बातम्या वाचणे नव्हे. तुम्हाला देशाचा जीडीपी, अर्थव्यवस्थेची वाढ यांसारख्या गोष्टींची ताजी माहिती नसली तरी एकवेळ चालेल, पण आपल्या स्वतःचे आर्थिक आरोग्य निश्चित करणाऱ्या सोप्या बाबींची माहिती नक्कीच हवी.

**-राम डावरे**

टुडेज् ब्लॉग

# माणूस, माणुसकीच्या शत्रूंविरुद्धचा संघर्ष

एकीकडे संपूर्ण जग माणसाच्या विकासासाठी नवनवीन संशोधनात गुंतले असतानाच दुसरीकडे मानवी सजीव सृष्टी नष्ट करण्याचे काम सुरू आहे. ज्या माणसांसाठी जगाची उठाठेव सुरू आहे तो माणूसच शिल्लक राहणार नसेल, तर या सगळ्याचा उपयोग काय, असा प्रश्न आपल्या अंतर्मनाला पडलाच पाहिजे. पृथ्वीवर अधिराज्य गाजवण्यासाठी सर्व सृष्टी आणि माणसे गमावली तर सत्ता कुणावर गाजविणार? म्हणून सभोवताली घडणाऱ्या घटनांवर व्यक्त होऊन हल्ला- प्रतिहल्ला केलाच पाहिजे. मग ते समाजकारण, राजकारण, सांस्कृतिकरण असो दुर्लक्षून चालणार नाही.

सृष्टी बघण्यासाठी दृष्टी असते. आपण ज्या दृष्टीने जगाकडे बघू तसं आपल्याला जग दिसेल. म्हणजेच जशी दृष्टी तशी सृष्टी. आपल्याकडे उपरोधानाने म्हटले जाते कावीळ झालेल्याला जग पिवळे दिसते.' म्हणून दृष्टी आणि दृष्टिकोन दोन्हीही सम्यक असावेत. केवळ सताड डोळे उघडे ठेवून वर्तमानात घडणाऱ्या घटनांकडे डोळेझाक करून, न बघितल्यासारखे सोंग करीत असू, तर त्याला काही अर्थ उरत नाही. त्यापेक्षा दृष्टिहीन चांगले. ज्यांना दृष्टी नसूनही दृष्टीपलीकडच्या आकलन शक्तींने ते सगळे जग बघत असतात. आपल्याला जे जे दिसते, ते चांगलेच असते असे नाही, तरीही चांगले करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अंधारलेल्या अनेक कोपऱ्यांवर आपली करडी नजर पडलीच पाहिजे.

सृष्टीवर होत असलेला संहार, मानवी समूहावर होत असलेला अन्याय, अत्याचार, बलात्कार याकडे सजग दृष्टीने समाजाचे चित्रण आपल्या डोळ्यात उभे राहिले पाहिजे. आपल्या मनाच्या गाभाऱ्यातून त्या वेदना-संवेदना निर्माण झाल्या पाहिजेत. आज माणसांप्रमाणेच राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये सत्ता, इर्षा, सामर्थ्यासाठी वर्चस्ववादाच्या उन्मादाने मानवी संहार करण्यासाठी स्पर्धा लागली आहे. युक्रेन रशियाच्या युद्धाची झळ संपते न संपते तोच हमास आणि इस्त्रायलमध्ये संघर्षातून अनेकांचा जीव घेतला आहे. पूर्वी रानटी अवस्थेत दगडांनी, नंतर शस्त्रास्त्राने होणारे युद्ध आता अणुबॉम्बच्या साह्याने काही सेकंदात जनजीवन बेचीराख केलं जातं. त्यामुळे मनुष्यच मनुष्याच्या विध्वंसास कारणीभूत ठरला आहे. माणसाची तुलना करताना दादा कोंडके यांच्या 'माणसा परास मेंढरं बरी' या गाण्याच्या ओळी आठवतात.

एकीकडे संपूर्ण जग माणसाच्या विकासासाठी नवनवीन संशोधनात




गुंतला असतानाच दुसरीकडे मानवी सजीव सृष्टी नष्ट करण्याचे काम सुरू आहे. ज्या माणसांसाठी जगाची उठाठेव सुरू आहे, तो माणूसच शिल्लक राहणार नसेल, तर या सगळ्याचा उपयोग काय? असा प्रश्न आपल्या अंतर्मनाला पडलाच पाहिजे. पृथ्वीवर अधिराज्य गाजवण्यासाठी सर्व सृष्टी आणि माणसे गमावली, तर सत्ता कुणावर गाजविणार? म्हणून सभोवताली घडणाऱ्या घटनांवर व्यक्त होऊन हल्ला प्रतिहल्ला केलाच पाहिजे. मग ते समाजकारण, राजकारण, सांस्कृतीकरण असो दुर्लक्षून चालणार नाही.

अलीकडे आपापसात वाद-विवाद वाढवून आपली पोळी भाजण्यासाठी राजकारणी कोणत्याही थराला जातात. नेते आणि महापुरुषांविरुद्ध गैरसमज पसरवून अपशब्द वापरणे केव्हाही निषेधार्हच असते, परंतु आपल्याकडे कुठलाही इशू किंवा विषय नाही म्हणून राजकारण करून समाजामध्ये दुही वाढवून सामाजिक एकात्मता दुभंगली जाते.आता माणूस आणि माणुसकीच्या शत्रूंविरुद्ध लढण्याची वेळ आली आहे.

लेखक कवी या सगळ्या घटनांवर बारीक लक्ष ठेवून आपल्या अंतर्मनातील खदखद कथा कवितेच्या माध्यमातून व्यक्त करत असतो. कवी बाळासाहेब झोडगे कार्यकर्ता कवी आपल्या अंतर्मनाची वेदना कवितेच्या रूपाने समाजाचे अंतर्भान राखून मनाविष्कार या काव्यसंग्रहातून त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि संस्कृतीवर होणाऱ्या हल्ल्याची अन्याय अत्याचाराची दखल घेतली आहे. टीकाकार कविता ही गवता 'सारखी बहरली' असे म्हणत असले, तरी कवीची दृष्टीही सूर्यप्रकाशाच्या पलीकडेही जाते असेही म्हटले जाते.

बाळासाहेब झोडगे सांगली जिल्ह्यातील माडगुळे या गावातून मुंबईला आलेला कवी. ज्या गावाने पद्मश्री ग. दि. माडगूळकर नामवंत कीर्तीचा कवी मराठी साहित्याला दिला. बाळासाहेब इयत्ता दहावीमध्ये कविता करतात आणि सेवानिवृत्तीनंतर मनाविष्कार हा पहिलाच काव्यसंग्रह प्रकाशित होतो. कवितेलाही वय असतं हे आता मान्य करावे लागेल. मनाविष्कार म्हणजे माडगूळपासून आधुनिक यांत्रिक मुंबईपर्यंतच्या धकाधकीच्या आयुष्यात आलेल्या अनुभवांचे गाठोडे. त्यांच्या कवितांना ग्रामीण मातीचा वास येतो. ते गावाहून मुंबईला चंदेरी दुनियेत आले

मनाविष्कार ६७ कवितांचा दीर्घ संग्रह. ज्येष्ठ साहित्यिक ज. वि. पवार यांच्या प्रस्तावनेने कविता आणि कवीची ओळख करून दिली आहे. कवितेची भाषा सहज सोपी समजणारी आहे.

**-प्रदीप जाधव**

जन्म हा अखेरचा

## सेव्यस्थल



पाण्याला रंग नसतो, परंतु लाल रंगाच्या प्याल्यात ते लाल दिसते तर हिरवा प्याल्यात ते हिरवे दिसते. त्याप्रमाणे अंतःकरणाशी संबंध आल्यावर आत्म्यात अंतःकरणाचे गुणधर्म दिसू लागतात. मन. बुद्धी, चित्त आणि अहंकार यांच्या समुच्चयाला 'अंतःकरण' म्हणतात. हेच 'अंतःकरण चतुष्टय' होय.

संकल्प-विकल्प करणे हा मना'चा धर्म आहे. निश्चय करणे हा 'बुद्धी'चा धर्म, चिंतन करणे हा 'चिता'चा धर्म तर अभिमान करणे हा अहंकारा'चा धर्म होय. अहंकारामुळेच जीवात्मा बद्ध होतो. 'ममेति बद्धयते जंतुः न ममेति विमुच्यते ।'

'मी' आणि 'माझे' हे तर जीवात्म्याच्या बंधनाचे कारण आहे. अनादिकालापासून हाच त्याचा स्वभाव बनलेला आहे. माणूस आपले नाव एखाद्या क्षणी विसरेल, परंतु मी पण विसरणे कधी शक्य नाही. बऱ्याचदा एखाद्याचे ठेवलेले नाव वेगळे असते आणि घरातली माणसे त्याला वेगळ्याच नावाने हाक मारीत असतात. मुलाचे चांगले सदाशिव' असे नाव ठेवायचे आणि त्याला 'बाब्या' म्हणून हाक मारायची, हे घराघरात पाहायला मिळते. माणसाला अनेक नावे असतात. ती सारी तो विसरू शकतो. परंतु 'मी' मात्र कधीही विसरत नाही. 'मी' हे व्याकरणात सर्वनाम आहे. त्याचा स्त्री-पुरुष, वृद्ध-बालक सर्वजण उपयोग करू शकतात. अनादिकाळापासून हे 'मी' पण आपल्या मागे लागलेले आहे. अंतःकरणाचा आश्रय घेतल्यामुळे जीवात्मा संकल्प-विकल्प करतो, निश्चय करतो, चिंतन करतो आणि मी पणाचा अभिमान देखील वाहतो. अभिमान हेच बंधनाचे कारण आहे. आणि अहंकारशून्य होणे हे मुक्तीचे कारण आहे.

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## बेरोजगारीचा दर गेल्या सहा वर्षातील पातळीत निच्चांकीवर...

लाकडाउनमध्ये जेव्हा सर्वच उद्योगधंदे बंद तेव्हा बेरोजगारीचा दर म्हणजेच सप्टेंबर व ऑक्टोबर डिसेंबर २०२२ कालावधीत तो ७. २ टक्के एवढया उच्च पातळीवर होता. तोच दर जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधीत ६. ८ टक्के घसरला होता . ताज्या श्रमशक्ती सर्वे क्षणातून ही आकडेवारी प्रसिध्द झाली आहे. देशातील १५ वर्षावरील व्यक्तीमधील बेरोजगारीचा दर जुलै २०२२ ते जून २०२३ या काळात घटून ३.२ टक्के एवढा कमी झाला आहे. अशीच घट महिलांच्या बेरोजगाराबाबत सुद्धा दिसून येत आहे. एकूणच ही देशाच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे. देशातील श्रमशक्ती डेटा हा अत्यंत महत्वाचा आहे हे लक्षात घेऊन एन एस एस ओ ने एप्रील २०१७ मध्ये कालबद्ध श्रमशक्ती सर्वे क्षणास सुरवात केली होत्ती . एकूणच देशातील रोजगार वाढल्याचे हे लक्षण आहे भारत सरकारने उचलेल्या अनेक पावलांमुळे हे शक्य झाले आहे असे वाटते. संरक्षण बाबतीत तर मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहे, एकेकाळी भारत या क्षेत्रात परावलंबी होता गेले काही वर्षे अन्न धान्याच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण आहोत. आज जगात अनेक राष्ट्रे महागाईने ग्रासली आहेत. त्या मानाने जागतिकदृष्ट्या तुलना करताना महागाईची झळ भारतात कमी आहे भारताने प्रगतीचा वेग घेतल्याचे हे उदाहरण आहे. याच बरोबर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताचा वृद्धिदर अंदाज मंगळवारी ०. २ टक्क्यांनी वाढवून ६. ३ टक्के केला आहे. जागतिक वृद्धिदर अंदाज घटवून ३ टक्के केला असताना सुद्धा भारताचा वृद्धी दर अंदाज नाणेनिधीने वाढविला आहे हे ही घटना भारताच्या दृष्टीने विशेष महत्वाची आहे. एकूणच या सर्व घटना म्हणजे भारताची प्रगतीची दृष्टीने होणारी मोठी वाटचाल हीच होय असे वाटते

**-शांताराम वाघ, पुणे**

# शिवारातून राजकारणाच्या फडात

शेतकरी नेते पाशा पटेल यांची राज्य कृषिमूल्य आयोगाच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा नियुक्ती झाली असून, गेली अनेक वर्षे शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी राजकारण-समाजकारण करणाऱ्या नेत्याला यामुळे त्याच्या आवडीच्या कामाची संधी मिळाली आहे. पटेल यांची राजकीय कारकीर्द वेगवेगळ्या पक्षांत मुशाफिरीची राहिली असली, तरी शेती व शेतकऱ्यांची कास त्यांनी सोडलेली नाही.

शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेच्या मुशीतून घडलेल्या कार्यकर्त्यांमध्ये लातूरच्या औसा येथील कार्यकर्ते पटेलही हिरीरीने सहभागी झाले. शेतीमालाला योग्य भाव मिळावा, या सूत्राभोवती उभ्या राहिलेल्या अनेक आंदोलनांमध्ये पटेल आघाडीवर राहिले. काही काळ शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही ते सहभागी झाले होते. अटलबिहारी वाजपेयी सरकारने शरद जोशी यांना केंद्रातील कृतिगटाचे अध्यक्षपद दिले, तेव्हा त्यांना 'शेतकऱ्यांचे पंचप्राण' म्हणून संबोधणाऱ्या अनेकांनी आपापल्या राजकीय वाटा निवडल्या. 'अल्पसंख्याक





नेत्यांनीही भाजपमध्ये यावे,' या भाजपचे तत्कालीन अध्यक्ष बंगारू लक्ष्मण यांच्या आवाहनानुसार पटेल यांनी भाजपचा झेंडा हाती घेत दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांचे नेतृत्वही स्वीकारले. मुंडे यांनी लगोलग त्यांची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड केली. पुढे त्यांची विधान परिषदेवर निवड झाली. रस्त्यावरील आंदोलनांप्रमाणेच पटेल यांनी विधिमंडळातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविला. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या विषयावर त्यांचे विधिमंडळातील भावपूर्ण भाषण लक्षात राहण्यासारखेच होते.

देवेंद्र फडणवीस यांच्या काळात कृषिमूल्य आयोगाच्या अध्यक्षपदावरील केलेली त्यांची नियुक्ती महाविकास आघाडी सरकारने रद्द केली. केंद्राच्या बांबू लागवड सल्लागार समितीचेही ते सदस्य होते. भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना राजकीयदृष्ट्या बाजूला ठेवून त्यांच्या निकटवर्तीयांना पदे देण्याचे पक्षश्रेष्ठींचे धोरण असतानाच कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी पटेल यांच्या नियुक्तीसाठी विशेष पाठपुरावा करून त्यांना गुरूदक्षिणा दिली आहे. शेतीमालाचे प्रश्न बिकट होत असताना पटेल हे नव्या भूमिकेतून शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी काय पाठपुरावा करणार आणि सरकार नावाची व्यवस्था त्याला किती दाद देणार, याची उत्सुकता आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

CMYK

## संक्षिप्त वृत्त...

### फळवणीत दुकान फोडून १८ हजारांचा माल लंपास

**वेळापूर :** फळवणी (ता.माळशिरस) येथे एकाच रात्री चोरट्यांनी किराणा दुकान आणि ॲग्रो दुकानच्या पाठीमागचा पत्रा उचकटून १४ हजारांचा ऐवज लंपास केला.यासंदर्भात रावसाहेब सखाराम अवताडे (रा.फळवणी) यांनी वेळापूर पोलिसांत फिर्याद दिली.

अवताडे यांचे ओम राज किराणा दुकान आहे. तर त्यांच्या शेजारी यश ॲग्रो मार्ट हे दुकान आहे. पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी दोन्ही दुकानाचे पाठीमागचा पत्रा उचकटून आत प्रवेश केला. किराणा दुकानातून साखर, ज्वारी, तेलाचे डबे आदी १४ हजारांचा तर शेजारच्या दुकानातून पिकावर फवारणी करण्याचे यंत्र, स्टार्टर असे ४ हजारांचा माल चोरून नेला. तपास सहाय्यक फौजदार रेगुडे करीत आहेत .

### वृद्धास धडक देऊन जखमी; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर :** वृद्धास पाठीमागून धडक देऊन जखमी होण्यास कारणीभूत ठरल्याप्रकरणी दुचाकी चालकाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. ही घटना मड्डी वस्ती ते प्रियंका चौक रोडवर घडली. दुचाकीस्वाराने (एमएच.१३. डीसी.६३८३) फिर्यादी संगप्पा उमाशंकर चाकोते (वय-७१, घोंगडे वस्ती) यांच्या (एमएच.१३.झेड.५६७२) मोपेडला पाठीमागून जोरात धडक देऊन त्यांना जखमी केले. याप्रकरणी संगप्पा चाकोते यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. याप्ररकणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हवालदार दुधाळे हे करीत आहेत.

### नवजात बालकाला रुग्णालयात सोडून महिलेचे पलायन

**सोलापूर :** एका अनोळखी महिलेने एक पुरुष जातीचे नवजात बालकाला सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचार चालू असताना कोणालाही काही न सांगता त्या बालकास सिव्हील हॉस्पिटल येथेच सोडून निघून गेली. ही घटना १ एप्रिल २०२३ रोजी घडली. याप्रकरणी तब्बल सहा महिन्यानंतर सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस हेडकॉन्स्टेबल पंकज नारायण महिंद्रकर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलकर्णी करीत आहेत.

### चोरट्याने गर्दीचा फायदा घेत पळवला मोबाईल

**सोलापूर :** अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन रुपा भवानी मंदिर येथे दर्शनासाठी आलेल्या फिर्यादी नीलकंठ चंद्रकांत करंडे (वय-५१, शिवशक्तीनगर, बाळे) यांच्या शर्टाच्या खिशातील चाळीस हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला.ही घटना रूपा भवानी मंदिर येथे घडली.

याप्रकरणी नीलकंठ करंडे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल आरेनवरू हे करीत आहेत.

### माहीममध्ये विजेचे पोल तोडून २५ हजारांच्या तारा पळविल्या

**सांगोला :** तालुक्यातील माहीम येथे दगडू बनगर यांच्या शेतातील दोन सिमेंटचे पोल तोडून चोरट्याने १ हजार फूट ॲल्युमिनीयमची तार आणि कंडक्टरसह अन्य साहित्य असा २५ हजारांचा माल चोरून नेला. या संदर्भात वीज वितरणचे राजेंद्र शिंदे यांनी सांगोला पोलिसांत फिर्याद दाखल केली. पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तपास हवालदार पाटील करीत आहेत.

### सिव्हिल हॉस्पिटलच्या पार्किंगमधून दुचाकी लंपास

**सोलापूर :** सिव्हिल हॉस्पिटल येथील नवीन बी ब्लॉकच्या पार्किंगमध्ये पार्क करून ठेवलेली दुचाकी (एमएच.१३. सीव्ही.८९९५) ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी नामदेव दत्तात्रय कांबळे (वय-३४, कर्दळी) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मुलाणी करीत आहेत.

### प्रॅक्टिससाठी जाताना अज्ञात वाहनाच्या धडकेत एक जखमी

**सोलापूर :** आयटीआय येथे डिझेल मेकॅनिक कोर्स पूर्ण करून प्रॅक्टिससाठी जाताना दुचाकीला अज्ञात वाहनाची धडक बसून, जखमी केल्याची घटना घडली. पुणे हायवे रोड, केगाव येथील कायझन होंडा कंपनी येथे फिर्यादी हाजीमंगल रहिमान नदाफ (वय-४२, सग्गमनगर) यांचा मुलगा सोहेल आणि त्याचा मित्र महंता यल्लप्पा नरेश (योगेश्वरनगर) हे महंता यांच्या (एमएच.१३.सीपी.१५४४) दुचाकीवरून जात असताना हैदराबाद-पुणे हायवे रोडवरील डी-मार्टजवळ अज्ञात वाहनाने धडकेने ते गंभीर जखमी झाले. अज्ञात वाहन चालक तसाच निघून गेला. अशा आशयाची फिर्यादी नदाफ यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली. याप्रकरणी अज्ञात वाहन चालकांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करीत आहेत.

## निधन वार्ता

### श्यामराव मस्के



**सोलापूर :** उत्तर तालुक्यातील कारंबा येथील रहिवासी श्यामराव मंकाळा मस्के यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६५ वर्षांच होते. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुली, एक मुलगा असा परिवार आहे.

### अशोक फसके

**मोहोळ :** मोहोळ येथील प्रतिष्टीत नागरीक, लिंगायत समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष अशोक भिमाशंकर फसके यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन सुना, एक विवाहित मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. मोहोळ चेंबर ऑफ कॉमर्सचे संस्थापक, महात्मा बसवेश्वर वधू- वर मंडळाचे उपाध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.





छायाचित्रातून...

**सोलापूर :** सोलापूर शहर आणि परिसरातील अनेक मंडळ, सामाजिक संघटना, संस्थेच्या माध्यमातून धम्म परिवर्तन दिनानिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी हजारोंच्या उपस्थितीत मिरवणुकीत सहभागी झालेले बांधव.

यावेळी विविध मंडळाचे कार्यकर्ते विविध पोषाखात पताके घेऊन मिरवुणकीत सहभागी झाले होते. समता सैनिक दलाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मानवंदना दिली. प्रबुध्द भारत तरुण मंडळाने मिरवणूक काढली. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा आणि पार्क चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.











# हजारोंच्या उपस्थितीत विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

## धम्मचक्र प्रवर्तन दिनः लेझीम, पथ संचलन, मिरवणुकीने वेधले सर्वांचे लक्ष

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर- शहरात विविध सामाजिक संघटना, मंडळ आणि संस्थेच्या वतीने ६७ व्या धम्मचक्र दिनानिमित्त पार्क चौकात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मिरवणुकीत सहभागी अनेक मंडळांनी वाजत-गाजत ढोल ताश्यांच्या निनादात मोठ्या जल्लोषात लेझीमचा डाव सादर करीत उत्साहात मिरवणूक काढली.**

'प्रबुध्द भारत'ची मिरवणूक

प्रबुध्द भारत (पी.बी. ग्रुप) मंडळाच्या वतीने पोलीस आयुक्त राजेंद्र माने, मनपा अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या चरणी पुष्प अर्पण आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.

यावेळी पोलीस उपायुक्त कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.संतोष गायकवाड, फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वनाथ सिद, शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार, प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे,काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, नगरसेवक गणेश पुजारी, गटनेते किसन जाधव, उमेश पाटील, संतोष पवार, जगधाने, रविकांत कोळेकर, पुरुषोत्तम धूत, पी.बी. ग्रुप प्रमुख गौतम चंदनशिवे, पी. बी. ग्रुप अध्यक्ष अमित बनसोडे, तुकाराम गायकवाड, अंजली वाघमारे, श्रीमंत जाधव, चंद्रकांत सोनवणे, ॲड. विशाल मस्के, अविनाश भडकुंबे, नितीन बंदपट्टे, कार्याध्यक्ष आदित्य चंदनशिवे, हृदयनाथ मोकाशी, उपाध्यक्ष श्रीकांत वाघमोडे उपस्थित होते.

या मिरवणुकीत एलईडी स्क्रीनद्वारे प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे बहाद्दर लेझीमचे डाव सादर केले. पारंपरिक वाद्य, तथागत गौतम बुद्ध यांची मूर्ती व पारंपारिक आर्टिफिशियल फुलांचा देखावा करण्यात आला.

भारत बाबरे, अभिजीत कापुरे, बाबा काकडे, धम्मपाल मैंदर्गीकर, उमेश रणदिवे, अमीत माने, संजय इंगळे, बंटी माने, धीरज वाघमोडे, नाना कापुरे, विजय इंगळे, कुमार सांगे, सतीश अडाकूल, जयराज सांगे, भीमराज मस्के, सुभाष स्वाके, गौतम शिंदे, विशाल गायकवाड, आशुतोष इंगळे, अंबादास कापुरे, सुनील गायकवाड, पिंटू वाघमोडे, ज्ञानेश्वर कांबळे, गौतम इंगळे, भिमा इंगळे, विशाल गाडे, अजय इंगळे, अमोल कुंदूर, प्रवीण शिंदे, शेखर कांबळे, बालराज जाधव ,गणेश डोळसे, धोंडिबा कापुरे, सुमित जाधव, प्रथमेश सुरवसे, राजू साबळे, आशुतोष इंगळे, मंगेश अंकुश, मिथुन बनसोडे, अमोल बनसोडे, गणेश डोळसे, विजय इंगळे, प्रमोद शिंदे, धनंजय कापुरे, धोंडिबा कापुरे, मनोज थोरात, अभिजीत गायकवाड, अमर सुरवसे, रवी सकट, सागर धेंडे उपस्थित होते.

**समता सैनिक दल**

सोलापूर - धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त येथील समता सैनिक दलाच्यावतीने बोधीसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास मानवंदना देण्यात आली. नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण झाले. नॉर्थकोट ते डॉ. आंबेडकर चौकापर्यंत शिस्तबद्ध पथसंचलन झाले. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली.

यावेळी समता सैनिक दलाचे जीओसी अण्णासाहेब भालशंकर, ज्युनिअर जीओसी राहुल भडकुंबे, वशिष्ठ सोनकांबळे, प्रकाश घटकांबळे, विजयकुमार कांबळे, सुनील डांगे, राजकुमार गायकवाड, अनिल जगझाप, कुणाल जानराव, प्रथमेश बनसोडे, आनंद शिंदे आदी उपस्थित होते.

सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षीदेखील पार्क चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात छोटे छोटे स्टॉल्स उभारण्यात आले होते. पुस्तके, बॅच बिल्ला, पाणी बॉटल, विविध प्रकारचे खाद्यपदार्थ अशी अनेक स्टॉल्स थाटण्यात आले होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी हजारोंच्या संख्येने सोलापूर शहर व परिरातील बांधव विविध मंडळाच्या मिरवणुकीत सहभागी होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यावेळी विविध मंडळांचे देखावे सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

### सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

सोलापूर : धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सोलापुरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर सुशीला आबुटे, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड. गौरव खरात, उमेश सुरते, बाबा मिस्त्री, विनोद भोसले, प्रवीण निकाळजे, गणेश डोंगरे, प्रमिला तूपलवंडे, बाबा करगुळ, वैष्णवी करगुळे, मधुकर आठवले उपस्थित होते.

**मी राजकारणातून निवृत्त झालोय; प्रणिती शिंदेच उमेदवार असतील**

यावेळी शिंदे म्हणाले, मी राजकारणातून निवृत्त झालोय, प्रणिती शिंदे याच उमेदवार राहतील. त्यासाठी माझ्याकडून जितका प्रयत्न होईल, तितका मी फिरतोय. असे सांगून हे मी किती वेळा सांगू, असे म्हणताच उपस्थित आणि पत्रकारांमध्ये हशा पिकला. राज्यात पदोन्नतीचा प्रश्न चर्चेचा ठरला आहे. या पदोन्नतीवर बोलताना शिंदे म्हणाले, मी मुख्यमंत्री असतानाच पदोन्नती सुरू केली. ज्यांच्यावर अन्याय झाला, त्यांना पदोन्नती मिळालीच पाहिजे. त्याचे पुढे काय झाले, हे आपण पहातच आहोत. काँग्रेसच्या काळात जे काही निर्णय झाले, ते योग्यच होते. अशा प्रकारचे चांगले निर्णय आताच्या सरकारमध्ये होत नाहीत, याचे वाईट वाटते.

# उजनीतून १ नोव्हेंबरपासून पहिले आवर्तन; तर जानेवारी महिन्यात शेवटचे आवर्तन

**५८ टक्के उपयुक्त पाणीसाठा असल्याने शेतीपिके वाचवण्यासाठी पाणी सोडण्याची शेतकऱ्यांची मागणी**

सुराज्य/सोलापूर

**सोलापूरसह पुणे, नगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनीत सध्या ५८ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. त्यामुळे रब्बीतील शेतीपिके वाचवण्यासाठी पाणी सोडण्याची शेतकऱ्यांची मागणी तीव्र होत आहे. याची दखल घेत उजनी लाभक्षेत्र विकास प्राधिकरण विभागाने पहिले आवर्तन दि. १ नोव्हेंबरपासून सोडण्याचे नियोजन केले आहे. त्यानंतर पुन्हा जानेवारीत शेवटचे आवर्तन सोडले जाईल. त्यानंतर सर्व पाणी पिण्यासाठीच राखीव ठेवले जाणार असल्याची माहिती लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी 'सुराज्य'शी बोलताना दिली.**

खरीप हंगामात पावसाळा सुरु असतानाही जिल्ह्यात सर्वदूर समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील बार्शी, करमाळा, माढा, माळशिरस व सांगोला हे पाच तालुकेच दुष्काळाच्या यादीत समाविष्ट झाले आहेत. इतर तालुकेही समाविष्ट केले जावेत, यासाठी लोकप्रतिनिधी मुख्यमंत्र्यांकडे मागणी करीत आहेत. यापुर्वीही पिकांसाठी पाणी सोडण्याची मागणी झाली, पण उजनी धरणातील उपयुक्त पाणीसाठा ३३ टक्क्यांपेक्षा कमी असल्याने पाणी सोडता आले नाही. आता रब्बी पिकांसाठी उजनीतून दोन आवर्तने सोडली जाणार आहेत.

दि. १ नोव्हेंबर ते १० डिसेंबरपर्यंत पहिले आवर्तन सुटेल. त्यासाठी किमान ८ टीएमसी पाणी लागेल, असा अंदाज आहे. सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून पाणी सोडल्यानंतर पुन्हा कॅनॉलमधून शेतीला पाणी सोडण्यास अडचणी येतात. त्यामुळे एक महिन्याच्या अंतराने दुसरे आवर्तन शेतीसाठी सोडण्याचे नियोजन केले आहे. पुढील वर्षीच्या पावसाळ्यापर्यंत सोलापूर



शहरासाठी किमान तीनवेळा भीमा नदीतून पाणी सोडावे लागणार आहे. त्यासाठी अंदाजे १८ टीएमसी लागणार आहे. उजनी धरणात १५ ते १८ टीएमसी गाळ आहे. सध्या उजनीतील एकूण पाणीसाठा ९५ टीएमसी असून, त्यातील गाळ वगळता उजनीत सध्या ८० टीएमसीपर्यंतच पाणी आहे. बाष्पीभवनातून आठ टीएमसी पाणी उडून जाते. धाराशीव, कर्जत-जामखेड, इंदापूर, बारामतीसह काही एमआयडीसी, सोलापूर जिल्ह्यातील नगरपरिषदा, ग्रामपंचायतींनाही उजनीचाच आधार आहे. त्यासाठी अंदाजे २० टीएमसी पाणी लागते.

सोलापूरसाठी तीन आवर्तनातून १८ टीएमसी तर शेतीच्या दुसऱ्या आवर्तनाला सात ते आठ टीएमसी पाणी लागेल. एकूण ५५ टीएमसी पाणी एप्रिल-मेपर्यंत सोडले जाईल. त्यानंतर गाळ वगळून राहिलेले १२ ते १५ टीएमसी पाणी पावसाळा सुरु होईपर्यंत ठेवावे लागेल. या पार्श्वभूमीवर एप्रिल-मे महिन्यात सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पाण्यासाठी टँकर सुरु होतील, असा अंदाज वर्तविला जात आहे.

### कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत निर्णय

शेतीसाठी पाणी सोडले जावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. त्यामुळे विभागाने शेतीसाठी पाणी सोडण्याचे नियोजन केले. परंतु पुढील तीन-चार दिवसांत कालवा सल्लागार समितीची बैठक होईल. त्यावेळी पालकमंत्री, लोकप्रतिनिधी,सल्लागार समिती सदस्यांच्या बैठकीत तारीख निश्चित करून यावर निर्णय घेतला जाईल. **- धीरज साळे**

अधीक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग

## संक्षिप्त वृत्त...



### राजू खरे यांच्यामार्फत पेनूरच्या शाळेसाठी ११ लाखांची मदत

**मोहोळ :** मोहोळ राखीव विधानसभा मतदार संघाचे शिवसेनेचे संभाव्य उमेदवार, उद्योजक राजू खरे यांनी पेनूर येथील राष्ट्रवादीचे नेते मानाजी माने यांच्या खासगी शाळेला ११ लाखांचा सरकारी निधीचा धनादेश शाळेकडे सुपूर्द केला आहे. विकासकामासाठी शासकीय निधीसह स्वनिधी देण्यावर त्यांनी भर दिला आहे. पेनूर येथे तीन महिन्यांपूर्वी गावभेट दौरा केला. त्यावेळी येथील शाळेच्या इमारतींची अवस्था चांगली नव्हती. शिवसेना जिल्हा प्रमुख चरणराज चवरे यांनी त्याबाबत मदत करण्यासाठी सुचविले होते. यावर तत्काळ खरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून खास बाब म्हणून निधी मंजूर देण्याचे आश्वासन दिले होते. खरे यांनी पाठपुरावा करून ११ लाखांचा निधी मंजूर करून त्याचा धनादेश दिला. यावेळी प्रकाश पारवे, दादासाहेब पवार, उमाकांत करंडे, समाधान खंदारे, दादासाहेब कर्णवर, अमर सोनवले, लखन वाघमारे, नेमिनाथ शिरसट, सोनुदादा शिंदे, आकाश फडतरे उपस्थित होते.




### नूतन सरपंच गोवर्धन जगताप यांचा सत्कार

**उत्तर सोलापूर :** तिऱ्हेचे नूतन सरपंच गोवर्धन जगताप यांचा सत्कार माजी आमदार दिलीप माने यांनी केला. यावेळी माने म्हणाले, गावच्या विकासासाठी सर्वांना विश्वासात घेऊन शासनाच्या योजना राबवा. गरजूंना विविध लाभ मिळवून द्या. ग्रामस्थांचा विश्वास संपादित करा, असे आवाहन केले. यावेळी बाळासाहेब सुरवसे, भास्कर सुरवसे, अजय सोनटक्के, अरविंद जाधव आनंदा जाधव, बबलू सुरवसे, महेश आसबे, योगेश पाटील, बलवंत कुलकर्णी आदी उपस्थित होते.



### डोंगरगावच्या सरपंचपदी सुरेखा बाबर

**सांगोला :** डोंगरगाव ग्रामपंचायतीच्या रिक्त सरपंच पदावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुरेखा तानाजी बाबर यांची निवड झाली. डोंगरगावच्या शेतकरी कामगार पक्षाच्या माजी सरपंच उषा रविकांत पवार यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या सरपंचपदाची निवडणूक पार पडली. या पदासाठी आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुरेखा बाबर यांनी तर विरोधात द्रौपदी फोंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला होता. सरपंच पदासाठी झालेल्या निवडणुकीत सुरेखा बाबर यांना ६ तर द्रौपदी फोंडे यांना ३ मते मिळाली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडल अधिकारी उल्हास पोलके यांनी सुरेखा बाबर यांना विजयी घोषित केले. बाबर यांचा सत्कार माजी आमदार दीपक साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आला.



### सुपंत गौरव पुरस्काराचे वितरण

**पंढरपूर :** माजी आमदार स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या जयंतीनिमित्त येळेवस्ती येथील राजयोगिनी अहिल्यादेवी होळकर मागासवर्गीय ट्रस्टच्या संस्थापिका माजी नगरसेविका कमल तोंडे यांच्यावतीने सुपंत गौरव पुरस्काराचे वितरण झाले. अध्यक्षस्थानी प्रणव परिचारक होते. याप्रसंगी सुपंत गौरव पुरस्काराचे मानकरी पंतप्रधान नरेंद्र मोदी पुरस्कार प्राप्त माती पाणी परीक्षण तज्ज्ञ बाळासाहेब लवटे, करकंब पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक निलेश तारू, मेंदू तज्ज्ञ डॉ.प्रवीण वायकुळे, रेल्वे पोलीस अधिकारी संजय चिटणीस, सुवर्ण महोत्सवीवर्षानिमित्त भारूड सम्राज्ञी चंदा तिवाडी यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास राजूबापू गावडे,डि.व्ही.कुलकर्णी, रा.पां.कटेकर, यावेळी सी.एन. देशपांडे, तम्मा घोडके, विवेक परदेशी, प्रीतम येळे, सचिन कुलकर्णी, युन्नूसभाई शेख, राजाभाऊ आंधळगावकर, पंडीत शेंबडे, आदित्य जोशी, प्राचार्य सुप्रिया बहिरट, शोभा बडवे, रेणुका देशपांडे, डॉ. भाग्यश्री वायकुळे, रेणुका घोडके, सुनिता तोंडे, शैलजा सलगर, विद्या बर्गे उपस्थित होते. सूत्रसंचलन ओंकार देसाई, आभारप्रदर्शन युवराज सलगर यांनी केले. यासाठी गणेश देसाई, अजिंक्य इंदापूरकर, वैभव यादव, रविभाऊ येळे, मिलिंद येळे, ज्ञानेश्वर तारे, दीपक येळे, प्रमोद राजहंस, सुनील चव्हाण, अशोक घोडके, संतोष वरपे, अर्जुन वाळूजकर आदींनी परिश्रम घेतले.

### गर्जना मंडळातर्फे १०४४ जणांची मोफत आरोग्य तपासणी

**सोलापूर :** मोदी, दुबई गल्लीतील गर्जना तरुण मंडळातर्फे आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात १०४४ जणांची तपासणी करण्यात आली. त्यांना मोफत औषधे देण्यात आली. ही तपासणी आनंद मार्ग युनिव्हर्सल रिफिल टीम यांच्यातर्फे घेण्यात आली. शिबिर यशस्वी करण्यासाठी सतीश म्हेत्रे, भीम मरेड्डी, भीमा रामदुर्ग, गोपी गुराखे, हनुमंत गोळेकर, मोहन कुंबळेकर, विकी अलपोले, नरसिमा कुंदरे, चेतन अरगोट, अंबादास कंदुरे यांचे सहकार्य लाभले.

# अक्कलकोट बसस्थानक परिसरातील अतिक्रमणास जाणीवपूर्वक विरोध

**सुराज्य/अक्कलकोट**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील बसस्थानकचे काही जागा अनेक वर्षापासून अतिक्रमण धारकांनी गिळंकृत केले होते. नवीन बसस्थानक बांधणी कामासाठी अतिक्रमण काढणे आवश्यक असतानाही सदर लोकांनी जाणीव पूर्वक विरोध करत होते. बंद पडलेले काम पुन्हा कडक पोलिस बंदोबस्तात काढण्यास सुरुवात करण्यात आले आहे.

मागील अनेक वर्षांपासून अतिक्रमण धारक व बसस्थांनकधारक यांच्यात वादविवाद सुरू होते. काही केले तरी निघत नव्हते. अध्यावत बसस्थांनक बांधणी साठी तब्बल २९ कोटी रुपये आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी मंजूर केली आहे. अतिक्रमण काढल्या शिवाय बांधकाम करणे अशक्य होते. म्हणून दोन दिवसांपूर्वी बसस्थांनक मागील बाजूस असलेल्या अतिक्रमण काढण्यासाठी सुरुवात केले असता. काही लोकांनी जाणीव पूर्वक विरोध करून काम बंद पाडले होते.

यामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ कडून पोलीस अधीक्षक सोलापूर यांच्याकडे पोलीस बंदोबस्तची मागणी केली होती. ते तात्काळ मंजूर करण्यात आले होते. यावेळी तहसीलदार बाळासाहेब सिरसट, नायब तहसीलदार विकास पवार, पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, भूमिअभिलेखचे अधिकारी बिराजदार, आगार प्रमुख जुनेदी, विभागीय अभियंता श्रीकांत सूर्यवंशी, स्थानक प्रमुख आणाराव चव्हाण आदी उपस्थित होते.

> एसटी स्टँड बांधकामासाठी २९ कोटी रुपये शासनाने मंजूर केला आहे. ते काम सुरू करण्यासाठी तात्पुरती शेड मारण्याचे काम सुरू असताना आमच्या जागेत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केलेले लोकांनी एकत्रित येऊन काम बंद पाडले होते. त्यामुळे आम्हाला नाईलाजस्तव पोलिस बंदोबस्त घेऊन काम सुरू करावा लागला आहे.
>
> \- श्रीकांत सूर्यवंशी
> (विभागीय स्थापत्य अभियंता)




### नॅब जिल्हा शाखेतर्फे पांढरी काठी दिन साजरा

**सोलापूर :** नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड जिल्हा शाखा यांच्यावतीने जागतिक पांढरी काठी दिन संपन्न झाला. राजीव गांधी मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाईंड व एन.ए.बी.निवासी अंध कार्यशाळेच्यावतीने विकास नगर चौक येथे फलक लावून साजरा करण्यात आला. लुई ब्रेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय शूजचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास अनुगीता पवार, शशिभूषण यलगुलवार, व्यंकटेश सोमाणी, संदीप कुलकर्णी, यशवंत बच्चूवार, लक्ष्मण पतंगे, कौस्तुभ पेंडसे, डॉ.देशपांडे, माणि यादव, प्राचार्य नरसिंह आसादे, मुख्याध्यापक डी.बी.तांबे, देवेंद्र भंडारे, रामचंद्र कुलकर्णी, कुंभार, कारभारी, शिंगाडे, साखरे, करजगी उपस्थित होते. व्यंकटेश सोमणी व पदाधिकाऱ्यांनी अंध विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडणे प्रात्यक्षित सहभाग घेतला. यावेळी मुख्याध्यापक डी.बी.तांबे यांनी आभार मानले.

## 'वालचंद'च वालचंद प्रीमियर लीग चषकाचा ठरला मानकरी

**ए.जी.पाटील महाविद्यालय उपविजेतेपदाचा मानकरी**

**सुराज्य/सोलापूर**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या स्थापनेला चाळीसवर्षे पूर्ण झाल्याप्रित्यर्थ वालचंद प्रीमियर लीग आंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सने ए.जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीवर मात करून वालचंद प्रीमियर लीग चषकावर आपले नाव कोरले.

अंतिम सामन्यात ए.जी. पी.आय.टी. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. १५ षटकात सर्वबाद ७६ धावा जमविल्या. यामध्ये अजिंक्य पाटील याने ३३ चेंडूमध्ये सर्वाधिक २२ धावा केल्या. लक्ष्मण मंजेलीने तीन षटकात १९ धावा देऊन तीन गडी बाद केले. धावांचा पाठलाग करताना वालचंदने केवळ ७.५ षटकात दोन गडी गमावून ८२ धावा पटकावून चषकावर आपले नाव कोरले.

यामध्ये रेवण देशमुखने नऊ चेंडूमध्ये दोन षटकार आणि ३२ धावा केल्या. मालिकावीर आणि उत्तम फलंदाज ए.जी. पाटील महाविद्यालयाचा प्रतिक



लोकरे ठरला. उत्तम गोलंदाज सचित शहा तर उत्तम यष्टीरक्षक श्रेयस सुरवसे ठरले. वालचंद भूषण शहा यांच्या हस्ते चषक बहाल करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. विजय आठवले, डॉ. सचिन देशमुख, अनुप म्हेत्रे, किरण चौगुले, राहुल हजारे, पी. पी. मित्रगोत्री, संप्रीत पटेल, शिवचरण कोरे उपस्थित होते. यासाठी करण वाघमारे, रोहन जाधव, दर्शन गहानूर, शिरीष सौदे, ऋषिकेश पिसके, प्रज्ञा इंदापुरे, ऋतुजा इंगळे, जीनेश पाटील यांनी परिश्रम घेतले.

## किरीटेश्वर मठात १५ नोव्हेंबरपासून धर्मसंकीर्तन

**सामुदायिक विवाह सोहळ्याचे १९ नोव्हेंबरला आयोजन**

**सुराज्य/सोलापूर**

भवानी पेठ, कुंभारवेस येथील श्री किरिटेश्वर संस्थान वीरक्त मठाचे वेदांताचार्य विद्यावाचस्पती लिं. पूज्य श्री मृत्युंजय महाशिवयोगींच्या ३४ व्या पुण्यस्मरणोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

बुधवार, दि. १५ नोव्हेंबरपासून सायंकाळी ६ वाजता धारवाड मुरघामठाचे मठाधिपती डॉ. पुज्य श्री मनिप्र मल्लिकार्जुन महास्वामीजी हे मुरघेंद्र महाशिवयोगी यांच्या जीवन चरित्रावर प्रवचन सांगणार आहेत. यावेळी धर्मसंकीर्तन कार्यक्रमही होणार आहे. रविवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी कुंभारवेस येथील किरिटेश्वर मठात सामुदायिक





विवाह सोहळा होणार असल्याची माहिती मठाधिपती निरंजनमूर्ती श्रीमनिप्र स्वामीनाथ महास्वामीजी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बुधवार, दि. १५ नोव्हेंबर ते रविवारी दि. १९ नोव्हेंबर या कालावधीत सायंकाळी ६ वाजता किरीटेश्वर मठामध्ये धारवाड मुरघामठाचे मठाधिपती डॉ. पूज्य श्री मनिप्र प्रमल्लिकार्जुन महास्वामीजी हे प्रवचन सांगणार आहेत.

सामुदायिक विवाह सोहळ्याला डॉ. शिवानंद महास्वामी, डॉ. चनबसप्पा महास्वामी, बसवलिंग महास्वामी, शिवानंद महास्वामी, प्रशांत महास्वामी, मृत्युंजय महास्वामी, पूज्यश्री महास्वामी, मुरुघेंद्र महास्वामी, देवणी महास्वामी, मंठाळ महास्वामी, रटगल महास्वामी, डॉ. शिवयोगी स्वामी, शिवलीलम्मा, सोलापूर महानगरपालिकेचे माजी सभागृह नेता सुरेश पाटीलउपस्थित राहणार आहेत.

दररोज सायंकाळी किरिटेश्वर भक्त मंडळ, अक्कनबळग, शंकरलिंग अक्कनबळग, मड्डी वस्ती अक्कनबळग, बसव केंद्राच्यावतीने भजन, कीर्तन, जनजागृतीचे कार्यक्रम होणार आहेत. विवाह सोहळ्यासाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन स्वामीनाथ महास्वामी यांनी केले आहे. यावेळी चन्नवीर भद्रेश्वरमठ, सुरेश पाटील, नागराज कोंडे, शिवानंद गंगावती, उद्योजक नितीन घटोळे, जगन्नाथ गरड, नागेंद्र बसवंती उपस्थित होते.

## माढा तालुक्यातील १६ गावांचा आरक्षणासाठी गावबंदीचा ठराव

**कुर्डूवाडी :** जोपर्यंत राठा समाजाला आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत सर्वपक्षीय नेत्यांना गाव बंदीचा माढा तालुक्यातील १६ गावांनी ठराव केला आहे. यामुळे आरक्षणाच्या मागणीचा जोर वाढत असल्याचे दिसत आहे. यापुढेही ठराव करणाऱ्या गावांच्या संख्येत वाढ होणार आहे.

> **ही आहेत १६ गावे:**
> कुर्डू, बारलोणी, बावी, तांदुळवाडी, कव्हे, भोसरे, रणदिवेवाडी, वेताळवाडी, रोपळे(बु.) वडाचीवाडी (त.म.) चिंचगाव, दरफळ सीना, भोगेवाडी जाखल, मोडनिंब दहीवली, शिराळ (मा.)

माढा तालुक्यातील दहा ग्रामपंचायतीने ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्या. अन्यथा निवडणुका व नेत्यांना गावबंदीचा एकमुखाने ठराव केला आहे. ग्रामपंचायत सदस्यच्या बैठकीत ग्रामपंचायत सदस्य व गावातील ग्रामस्थांच्यावतीने मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळेपर्यंत येणाऱ्या सर्व निवडणुकांवर व मतदानावर बहिष्कार, गावामध्ये सर्व पक्षाच्या नेते, पुढारी, राजकीय सभांना बंदीचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. यावेळी सरपंच उपसरपंच, सदस्य उपस्थित होते. भोसरे गावाने ठराव करुन वेशी बाहेर गावबंदीचा फलक लावला आहे. ठराव झालेल्या गावांमध्ये लवकरच फलक लावण्यात येणार आहेत.



## श्री दुर्गामाता दौडमध्ये २५० जण सहभागी

**सुराज्य/वेळापूर**

माळशिरस तालुक्यातील वेळापुरात नवरात्र उत्सवानिमित्त सकल हिंदू समाज यांच्यावतीने गेले नऊ दिवस रोज सकाळी श्री अर्धनारी नटेश्वर मंदिरापासून आयोजित दुर्गामाता दौडचा समारोप विजयादशमी दसऱ्याच्या दिवशी झाला.

दररोज २०० ते २५० हिंदू समाज बांधव व भगिनी या दुर्गा माता दौडमध्ये मोठ्या उत्साहाने सहभागी होत होते. यासाठी वेळापूर व पंचक्रोशीतील सर्व हिंदूत्त्ववादी संघटना, सकल हिंदू समाज बांधवांनी परिश्रम घेतले. प्रत्येक गल्लीमध्ये रांगोळी काढून ध्वज पूजन करून दुर्गामाता दौडचे स्वागत करण्यात आले.

## घुंगरेगाव ग्रा.पं.सदस्यपदी अनसा गुरव

**सुराज्य/अक्कलकोट**

घुंगरेगाव ग्रामपंचायत सदस्यपदी अनसा गुरव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुक छाननीत सात सदस्य संख्या असलेल्या घुंगरेगावच्या प्रभाग क्रमांक दोनमधून ग्रामपंचायत सदस्यासाठी सर्वसाधारण स्त्री प्रवर्गातून त्यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली.

उर्वरीत सहा सदस्यासाठी १२ उमेदवार, थेट सरपंच पदासाठी ३ उमदेवार अर्ज दाखल झाल्याने सरळ सरळ एकमेकांविरुद्ध लढत होईल.

## नवरात्रौत्सवानिमित्त ६ हजार देवी भक्तांची मोफत आरोग्य तपासणी

**फॅमिली प्लॅनिंग, लायन्स क्लबचा स्तुत्य उपक्रम**

**सुराज्य/सोलापूर**



फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग आणि जिज्ञासा सोलापूर विभाग यांच्या विद्यमाने नवरात्र महोत्सवात सोलापूरचे आराध्य दैवत श्री रूपाभवानी देवस्थान येथे येणाऱ्या भाविकांची मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात आले. यावेळी दररोज ८०० ते ८५० देवी भक्तांना सेवा देण्यात आली. १०० ते १५० भाविकांची शुगर व एच.आय.व्ही तपासणी केली. ५०० ते ६०० भाविकांची बी.पी. तपासणी केली. आजपर्यंत ६००० देवी भक्तांनी या सेवेचा लाभ घेतला.

लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रलचे अध्यक्ष आझम शेख, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी या उपक्रमाविषयी माहिती सांगितली.

यावेळी आरोग्य तपासणी, संधी साधू आजार, समरयांवर मोफत औषधोपचार, ब्लड प्रेशर, हिमोग्लोबीन आदींची तपासणी केली. तसेच जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण संस्थेच्यावतीने मोफत शुगर तपासणी, इच्छुकांची एच.आय.व्ही. तपासणी केली. आभा कार्ड काढून देण्यात आले.

याचे उद्घाटन रूपाभवानी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष मल्लिनाथ मसरे यांनी केले. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष ला. आझम शेख, सचिव सीए चंद्रकांत रच्चा, चंद्रकांत यादव, विठ्ठल सारंगी, डॉ. अग्रजा वरेरकर-चिटणीस, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, डॉ. रजनी गायकवाड, सुनील मासरे, अनिल मासरे, राजू स्वामी उपस्थित होते.

यावेळी आ. प्रणिती शिंदे, उज्ज्वला शिंदे, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, आग्रजा वरेरकर-चिटणीस, रजनी गायकवाड, भगवान भुसारी, कृष्णा सकट, दिनेश राठोड, सिद्धाराम कोतली, संगमेश्वर रघोजी, चित्तरंजन जोशी, विजया महाजन, वैशाली बनसोडे यांनी भेट दिली.

यासाठी विरेंद्र परदेशी, आकाश गायकवाड, कल्पना गडगडे, रोजमेरी गायकवाड, शुभांगी नाईकवाडी, आशालता मस्के, करण खानापुरे, दीनकर बनसोडे यांनी परिश्रम घेतले.

# एकीकडे तरुणाईला व्यसनमुक्तीचे धडे देता; दुसरीकडे 'बियर'वरचे शुल्क कमी करता

**सुराज्य/सोलापूर**

**प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते काकासाहेब कुलकर्णी यांचे मत**

एकीकडे महाराष्ट्र राज्य शासन तरुणाईला व्यसनमुक्तीचे धडे देत असताना दुसरीकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि संबंधीत मंत्री महोदय बियरची विक्री वाढवण्यासाठी त्याचे दर कमी करण्याच्या तयारीत आहेत, हे योग्य नाही. जर शासनाला महसूल वाढवायचा असेल तर कर बुडवणाऱ्यांकडून सक्तीने कर वसूल केला पाहिजे. तसेच अन्य मार्गानेही कर गोळा करता येऊ शकतो, असे मत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश प्रवक्ते प्रा. काकासाहेब कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे व्यक्त केला आहे.

बियर विकून शासनाचा महसूल वाढवण्यासाठी शासनाने दि. १९ तारखेला राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्य समिती नेमली आहे. या समितीद्वारे राज्यांमध्ये बियर विक्री वाढवण्यासंबंधी त्याचे शुल्क कमी करण्यासाठी ही समिती स्थापन केली आहे.

मात्र राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराजे देसाई यांनी बियर विक्री वाढवण्यासंदर्भात जीआर काढून एक प्रकारे महाराष्ट्रातील तरुणांची थट्टाच केली आहे? असा सवालही कुलकर्णी यांनी केला आहे.

**शासनाच्या महसूल वाढीसाठी समाज, तरुणाईला व्यसनाधीन करणार का?**



## संक्षिप्त वृत्त...




### वेळापूरच्या सेंट जॉन स्कूलमध्ये कलाविष्कार सोहळा उत्साहात

✔ **वेळापूर** : सेंट जॉन इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये कलादिन, कलाविष्कार सोहळा उत्साहात पार पडला. उद्घाटन वेळापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थापक सोमी जॉन, मुख्याध्यापिका शिजी जॉर्ज उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून नकाते, वाघमारे, ननवरे, प्रियंका वाघमारे यांनी काम पाहिले. इयत्ता नर्सरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम अशा पद्धतीने आपल्या कलाविष्काराचे सादरीकरण केले. सूत्रसंचालन शिजो मॅथ्यू, तेजश्री राऊत यांनी केले. यासाठी प्रिया पिसे, नकाते, ननवरे, प्रियंका वाघमारे, प्रशांत पांढरे यांनी परिश्रम घेतले.

### 'धानोरे'च्या जान्हवी जानकर यांची पुणे अधीक्षकपदी नियुक्ती



✔ **वेळापूर** : धानोरे वेळापूरची कन्या जान्हवी रामचंद्र जानकर यांची मुंबई मंत्रालय येथे सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून २०१९ मध्ये नियुक्ती झाली होती. त्यांनी चार वर्षे सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून चांगल्या कामाची मोहर उठवली असून, त्यांची नुकतीच सांस्कृतिक कार्य संचनालय विभागीय कार्यालय, पुणे येथे अधीक्षक या पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल बंधू उत्तमराव जानकर, माळशिरसचे नगराध्यक्ष अप्पासाहेब देशमुख, उद्योजक बबनराव देवकते, राजेंद्र देवकते, नामदेव देवकते, तानाजी जानकर, आबासाहेब देवकते, भाऊसाहेब जानकर, विठ्ठल देवकते, संतोष डोंबाळे, दिलीप सरगर, सुनील देवकते यांनी अभिनंदन केले आहे.



जेऊर येथील रक्तगट तपासणी शिबिराच्या शुभारंभाप्रसंगी मल्लिकार्जुन पाटील यांच्यासह इतर मान्यवर.

### काशीलिंग देवस्थानच्या शिबिरात २५०० विद्यार्थ्यांची होणार तपासणी

✔ **अक्कलकोट** : जेऊर (अक्कलकोट) येथील श्री काशीलिंग देवस्थान ट्रस्टच्यावतीने सुमारे अडीच हजार विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. याचा प्रारंभ श्री काशी विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा माजी जिल्हा परिषद सदस्य मल्लिकार्जुन पाटील यांच्या हस्ते दीप प्रजल आणि श्री काशीविश्वेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी देवस्थान समितीचे सुभाष पाटील, शिवराज बोरीकरजगी, काशिनाथ कडगंची, मुख्याध्यापक राजकुमार अमोगी, मुख्याध्यापक राजशेखर चौधरी उपस्थित होते. या शिबिरांतर्गत संस्थेच्या जेऊर, अक्कलकोट, हैद्रा, कै.महादेवराव पाटील आश्रम शाळा, बादोला, जेऊर येथील जिल्हा परिषद शाळा, जेऊर येथील विविध वस्तीशाळातील विद्यार्थी असे एकूण अडीच हजार विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी केली जाणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन मारकड, प्रयोगशाळा सहाय्यक शफीक शेख, आरोग्य सहाय्यक शिवगंगा व्हनमाने, सतीश सकोजी, सुनील नावदगी आदींच्या सहकार्याने जेऊर, अक्कलकोट येथील पाचवी ते बारावी या विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करून त्यांना नोंद कार्डदेखील देण्यात येत आहे. इतर सर्व शाळांची देखील तपासणी सुरु आहे.

# शेतकऱ्यांनो, परिपक्व ऊस देऊन सहकार्य करा

## बबनराव शिंदे यांचे आवाहन

## म्हैसगाव विठ्ठल कॉर्पोरेशनच्या गळीप हंगामाचा शुभारंभ

✔ सुराज्य/कुर्डूवाडी



विठ्ठल कॉर्पोरेशन या साखर कारखान्याने गतवर्षी ६५ टक्के इथेनॉल व ३५ टक्के साखर उत्पादित केले आहे. चालू गाळप हंगामासाठी तोडणी वाहतूक यंत्रणा पूर्ण क्षमतेने भरण्यात आली असून, ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी परिपक्व ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन आमदार बबनराव शिंदे यांनी केले आहे.

म्हैसगाव (माढा) येथील विठ्ठल कॉर्पोरेशनच्या गळीप हंगामाच्या शुभारंभ आमदार बबनराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आर.एस रणवरे, कार्यकारी सल्लागार विजयकुमार गिलडा, टेक्सटाईल विभागाचे जनरल मॅनेजर चितळे, चिफ केमिस्ट प्रदीप केदार, चिफ इंजिनिअर मोहन पाटील, मुख्य वित्तीय अधिकारी भास्कर गव्हाणे, मुख्य शेती अधिकारी महेश चंदनकर, डिस्टीलरी मॅनेजर अनिल शेळके, परचेस ऑफिसर कल्याण पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रदीपकुमार पाटील, सुहास वेदपाठक, एच. आर. मॅनेजर परमेश्वर माळी, सुरक्षा अधिकारी सचिन शिंदे उपस्थित होते.

गतवर्षीच्या गाळप झालेल्या उसास आजतागायत २३०० रुपये प्रती मेट्रीक टनास उत्पादकांना अदा केली आहे. उर्वरीत २०० रुपये दिवाळी सणानिमित्त आणि डिसेंबरमध्ये १०० रुपये देण्यात येणार आहेत.

विठ्ठल कॉर्पोरेशनचे संस्थापक चेअरमन तथा आमदार संजयमामा शिंदे म्हणाले, गतवर्षी ५ लाख ५९ हजार मेट्रीक टन ऊस गाळप केले आहे. यासाठी ऊस उत्पादक सभासद, बिगरसभासद, कारखाना कर्मचारी, तोडणी वाहतूकदारांचे मोलाचे योगदान मिळाले आहे. सध्या पाण्याची बिकट परिस्थिती असून, ऊस तोडणीनंतर शेतकऱ्यांनो पाचट जाळू नका.

प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी आर. एस. रणवरे, सूत्रसंचालन केनयार्ड सुपरवायझर अजिनाथ गोडगे, आभारप्रदर्शन असिस्टंट जनरल मॅनेजर वैभव काशिद यांनी केले.

#### कर्मचाऱ्यांनी उत्तम काम केले; दिवाळीसाठी ८.३३ टक्के बोनस

कारखाना कर्मचाऱ्यांनी उत्तम प्रकारचे काम केल्याने दिवाळी सणासाठी ८.३३ टक्के बोनस देण्यात येणार आहे. गतवर्षी एकूण गाळप केलेल्या उसांपैकी ६५ टक्के इथेनॉल आणि ३५ टक्के साखर उत्पादित करणारा आपला विठ्ठल कारखाना हा महाराष्ट्रातील कदाचीत पहिला कारखाना असावा. यावर्षी कारखान्याच्या सभासदांना शेअर्सच्या पटीमध्ये प्रती शेअर्स ३० किलो साखर मोफत वाटप केले आहे. जागतिक पातळीवरील घसरलेले साखरेचे दर, दुष्काळी परिस्थिती, कारखान्याचे विस्तारीकरण या सर्व अडचणींवर मात करत नवीन गाळप हंगामासाठी कारखाना सज्ज आहे, असे आ.शिंदे म्हणाले.

## शांतता बिघडवणाऱ्या समाज प्रवृत्तींना रोखा; अन्यथा त्यांचा बंदोबस्त करु : यामावार

### अक्कलकोटमधील शांतता कमिटीच्या बैठकीत आवाहन

✔ सुराज्य/अक्कलकोट



शहरातील बोटावर मोजण्याइतक्या काही माथेफिरुंमुळे शांतता बिघडत आहे. समाजातील प्रतिष्ठित लोकांनी त्यांची समजूत काढून त्यांना आवरा, अन्यथा त्यांचा बंदोबस्त करू, असा इशारा उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार यांनी दिला.

अक्कलकोट येथे शांतता कमिटीच्या बैठकीप्रसंगी यामावार बोलत होते.

स्वामींचे श्रद्धास्थान असलेल्या अक्कलकोट शहराला गालबोट लागू नये म्हणून प्रत्येकाने जबाबदारी पार पाडावी. अन्यथा आमचे काम आम्ही करू, अशा इशारा प्रांताधिकारी विठ्ठल उदमले यांनी दिला.

याप्रसंगी प्रांताधिकारी विठ्ठल उदमले, तहसीलदार बाळासाहेब सिरसट, पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, महेश हिंडोळे, मीलन कल्याणशेट्टी, महेश इंगळे, अमोलराजे भोसले, अविनाश मडिखांबे, सद्दाम शेरीकर, रईस टिनवाला, सलीम येळसंगी, एजाज मुतवल्ली, शिवशरण जोजन, इरफान दावणा, सुनील खवळे, मतीन पटेल, अकील बागवान, नन्नू कोरबू, अमर सिरसट, चंद्रशेखर मडिखांबे, रज्जाक सय्यद उपस्थित होते.

शांतता बिघडविणाऱ्या प्रवृत्ती आणि त्यांना खतपाणी घालण्याचे प्रकार बंद होण्यासाठी उपस्थित नेत्यांनी एकमुखाने शपथ घेऊन समाजकंटकांना वेळीच रोखले पाहिजे. त्याशिवाय केवळ बैठकावर बैठका घेऊन काही उपयोग होत नाही, असे स्पष्ट मत प्रहारचे अमर सिरसट यांनी व्यक्त केले. काही लोकांमुळे शहराचे नाव खराब होत आहे. यामुळे येणाऱ्या भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. शेकडो कुटुंबाची उपासमार होईल, असे महेश इंगळे यांनी सांगितले.

## 'स्टेट ट्रान्सपोर्ट बँके'च्या गैरव्यवहाराची चौकशी करावी

### अन्यथा आंदोलन; आबासाहेब गोसावी यांनी दिला इशारा

✔ सुराज्य/वेळापूर

पंढरपूर येथील स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेने नियमबाह्य कर्जवाटप केले आहे. कर्ज खात्यातील गैरव्यवहार, ज्यादा वसुली आणि बँकेच्या मनमानी कारभाराची शासनाकडून चौकशी व्हावी. संचालक आणि बँक अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी, अन्यथा दि. ३० ऑक्टोंबर रोजी धरणे आंदोलन करण्याचा इशारा खंडाळी (माळशिरस) येथील अकलूज आगारातील एसटी चालक आबासाहेब वसंत गोसावी यांनी जिल्हा निबंधक सहकारी संस्था यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनाचा आशय असा की, गोसावी हे अकलूज आगारात एसटी ड्रायव्हर या पदावर काम करीत आहे. त्यांचे स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँक शाखा, पंढरपूर येथे खाते आहे. एसटी कर्मचारी हरिदास हागवणे यांच्या कर्ज खात्याला ते जामीनदार आहेत. हगवणे यांना बारा लाख रुपये वेळोवेळी कर्ज दिले आहे. सदर कर्ज हागवणे भरत आहेत, ते कर्ज त्यांच्या पगाराच्या क्षमतेनुसार नियमबाह्य आहे.

बँकेचे अधिकारी संचालकांच्या मदतीने नियमबाह्य कर्ज वाटप व नियमबाह्य कर्ज वसुली करीत आहेत. त्यांना बँकेने कोणतीही नोटीस न देता हागवणे यांच्या कर्जाचा जामीनदार म्हणून त्यांच्या पगारातून वसुली सुरु केली आणि ती नंतर बंद केली. बँकेच्या नियमानुसार बँक काम करीत नसून, अशा मनमानी कारभारामुळे अनेक एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधारात जाऊ शकते.

जिल्हा उपनिबंधक यांनी शासन स्तरावर चौकशी करावी. बँकेवर गुन्हे दाखल करावेत. अन्यथा धरणे आंदोलन करण्याचा इशारा गोसावी यांनी दिला आहे.

## भरवशाची नक्षत्रे कोरडी; खरीप, रब्बी पिके धोक्यात

### दक्षिणचा शेतकरी अडचणीत

### शेतीसाठी कालव्यातून पाणी सोडण्याची एम.के. फाऊंडेशनची मागणी

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यात शेतकऱ्यांच्या भरवशाची असणारी पावसाची नक्षत्रे कोरडी गेल्याने खरीप व रब्बी हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. पिकांना जीवनदान मिळण्यासाठी कालव्यातून पाणी सोडण्याची मागणी एम.के. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी केला आहे.

पेरणी केल्यानंतर तीन महिन्यांपासून तूर, मूग, भुईमूग, सोयाबीन, मका यांसह इतर पिके करपून गेली आहे. ऊस, पपई, द्राक्षे, केळी व डाळिंब या पिकांवरही पावसाचा परिणाम झाला आहे. मंद्रुप परिसरात निंबर्गी, कंदलगाव, गुंजेगाव, गावडेवाडी, अकोले मंद्रूप, मंद्रूप, बसवनगर आदी गावातील शेतासाठी उजनी धरणातून कालव्यात पाणी सोडण्यात येते.

मात्र सहा महिन्यांपासून कालव्यात पाणी सोडण्यात आले नाही. त्यामुळे परिसरातील जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. शिवाय जिरायत व बागायत पिकेही धोक्यात आहेत. म्हणून कालव्यातून पाणी सोडण्याची मागणी महादेव कोगनुरे यांनी केली आहे.

#### जिल्ह्यासह राज्यात कमी पाऊस; तालुक्यात दुष्काळसदृश्य स्थिती

खरीप हंगाम सुरू झाल्यानंतर रोहिणी, मृग, आर्दा, पुष्य, पुनर्वसू, हस्त यासारखी भरवशाची पावसाची नक्षत्रे कोरडी गेल्याने व पावसाने विश्रांती घेतल्यामुळे दक्षिण तालुक्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात खरीप हंगामात तूर, मूग, उडीद, भुईमूग, बाजरी, सोयाबीन, मका यांसह अन्य पिकांची पेरणी झाली होती. दरवर्षी पावसाळ्यादरम्यान शेतीसाठी पाणी सोडण्यात येत होते. मात्र यावर्षी पावसाने ओढ दिल्याने उजनी धरणातही अपेक्षित पाणीसाठा नसल्याने शेतीसाठी पाणी सोडण्यात आले नाही.

## मोरोची आश्रम शाळेत वृक्षारोपणाचा कार्यक्रम

✔ सुराज्य/नातेपुते

आचार्य श्री सुनील सागर महाराज, उपाध्याय श्री विकसंत सागर महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त मोरोची (माळशिरस) येथील मोरोची आश्रम शाळेत विराग विकसंत समितीतर्फे वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. आश्रम शाळेतील २०० निवासी विद्यार्थ्यांना मिष्टान्न स्नेहभोजन देण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष वैभव शहा, संचालक विराग गांधी, सुयोग दोशी, प्रीतम दोशी, सागर दोशी, निकीता शहा, प्रिती दोशी, अमृता देसाई, मुख्याध्यापक सूळ उपस्थित होते. यावेळी वैभव शहा यांनी शुध्द आहार, शाकाहार याविषयीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.शाकाहार जेवणाचे शरीरात होणारे फायदे व मांसाहार केल्याने शरीराचे होणारे नुकसान याविषयी माहिती दिली.




## मराठा समाजाच्या आरक्षणासाठी तारापुरात पुढाऱ्यांना 'गाव बंदी'

✔ सुराज्य/पंढरपूर

जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत पंढरपूर परिसरातील तारापूर येथे आमदार, खासदार, तालुक्यातील नेत्यांना गावामध्ये गावबंदी घालण्यात आली असून, त्यांना गावात येण्यास अथवा कोणतेही राजकीय कार्यक्रम घेण्यासही बंदी घालण्यात आली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळविण्यासाठी मराठवाडा, खानदेशच्या धर्तीवर नेत्यांना गाव बंदी करणारे जिल्ह्यातील तारापूर (ता.पंढरपूर) गाव आहे.

मराठा क्रांती मोर्चाचे आंदोलन आता प्रखर होताना दिसत आहे. नेत्यांना गावबंदी निर्णयाचा तारापूर गावामध्ये एकजुटीने घेतला आहे. आरक्षणाला विरोध करून आपल्यामध्ये फूट पाडणारे मराठा समाजाचे नेते मंत्री नारायण राणे, रामदास कदम यांचा निषेधदेखील यावेळी करण्यात आला. सध्या पंढरपूर तालुक्यातील अनेक गावांतील मराठा बांधवांनी सर्व राजकीय नेत्यांना गावबंदीचे फलक तारापूर गावाच्या प्रवेशद्वारावर झळकविण्यास सुरुवात केली आहे. गावागावात केंद्र आणि राज्य सरकारच्या सत्तेतील मंत्र्यांचे फोटो लाऊन दहन करण्यात येणार आहे. गावातील मराठा बांधव स्थानिक पातळीवरील गट-तट, भावकीचे वाद-विवाद बाजूला ठेवत मराठा आरक्षणासाठी पुढे येताना दिसत आहेत.

गावात संपूर्णपणे एकी ठेवून काम करणे आणि मराठा समाजाची ताकत दाखून देणे, समाजात फूट पडू न देणे आणि सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी गावातील भुई, कोष्टी, ब्राह्मण, इतर सर्व समाजातील पुढाऱ्यांना गाव बंदी करण्यास जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.

# दूध संघांचे धोरण; शेतकऱ्यांचे मरण

### शासन अध्यादेशाच्या अंमलबजावणीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

## गायीच्या दूधाचे दर कमी केले ; जन आंदोलनाचा दिला इशारा

✔ सुराज्य/सोलापूर



जिल्ह्यातील सर्वच खाजगी दूध संघांनी शेतकऱ्यांच्या दूध खरेदी दरात मोठी कपात केली आहे.

शासन आदेशानुसार ३४ रुपये असणारा दर तब्बल ५ रुपयांनी कमी करून २९ रुपये केला आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. दुधास योग्य भाव मिळत नसल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. तरी शासन आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी. अन्यथा जन आंदोलन करण्याचा इशारा दूध उत्पादक शेतकऱ्यांनी केला आहे.

पूर्वी शेतीला जोडधंदा म्हणून शेतकरी दूध व्यवसायाकडे पाहत होता. मात्र, मध्यंतरी वाढलेल्या दरामुळे तरुणवर्गही दूध व्यवसायाकडे वळला आहे. मागील दोन महिन्यांपासून गायीच्या दूध दरात वाढ झाली होती. प्रतिकूल परिस्थितीमध्ये दरात वाढ झाल्याने शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला होता. शिवाय स्थानिक पातळीवर वाढत्या दराची अंमलबजावणी झाल्याने त्याचाही फायदा झाला होता; मात्र पुन्हा दूध संघाची मनमानी पद्धतीने दर कमी केल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसणार आहे.

#### एकीकडे पशुखाद्याची दर वाढ; दुसरीकडे दुधाचे दर कमी केले

पशुखाद्याचे दर वाढत असताना आणि दुधाला चांगली मागणी असतानाही दुधाचे दर कमी होत आहेत. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच दुधाला प्रतिलिटर ३७ रुपये दर मिळाला होता. यामुळे तरुणाई दूध व्यवसायाकडे वळली. त्यांनी बँकेचे, पतसंस्थेचे कर्ज घेऊन, तरुण या व्यवसायात गुंतवणूक केली आहे. त्यांना मोठा आर्थिक फटका दूध दर कपातीमुळे बसणार आहे. नव्याने धंद्यात उतरलेला तरुणवर्ग कर्जाच्या विळख्यात अडकणार आहे. दूध व दुग्धजन्य पदार्थांना वाढती मागणी असूनही गायीच्या दूध दरात ५ रुपयांनी कपात केल्याने संकट वाढले आहे.

#### दूध दरवाढीच्या धोरणातील चुकींमुळे शेतकऱ्यांचा तोटा

महाराष्ट्र सरकारने जुलै महिन्यात दूध दर निश्चितीसाठी समिती स्थापन करून समितीच्या अहवालानुसार अध्यादेश काढून गायीच्या दुधास ३४ रुपये दर निश्चित केला. दर ३ महिन्यांनी समितीची बैठक घेऊन दूध व्यवसायातील अडचणींवर चर्चा करण्याचे जाहीर केले. जाहीर केलेल्या दूध दरवाढीमुळे दूध उत्पादकांचा फायदा होण्याऐवजी तोटाच होत आहे. सरकारने जाहीर केल्याप्रमाणे गाईच्या दुधाला प्रती लिटर ३४ रुपयांचा दर शेतकऱ्यांना मिळत नाही.त्यामुळे सरकारने तातडीने धोरणात बदल करावा, अशी मागणी दूध उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### नीलेश राणे यांची राजकीय निवृत्तीची घोषणा



**मुंबई :** माजी खासदार आणि नारायण राणे यांचे सुपुत्र नीलेश राणे यांनी मंगळवारी तडकाफडकी राजकारणातून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली. एक्सवरुन त्यांनी एक पोस्ट शेअर केली. त्यामध्ये नीलेश राणे यांनी राजकारणातून निवृत्ती घेण्याचे कारण स्पष्ट केले आहे. मी सक्रिय राजकारणातून कायमचा बाजूला होत आहे, आता राजकरणात मन रमत नाही, इतर काही कारण नाही, असे त्यांनी म्हटले आहे. निलेश राणे यांनी अशाप्रकारे तडकाफडकी निवृत्तीचा निर्णय जाहीर केल्याने अनेकांना धक्का बसला आहे. निलेश राणेंच्या ट्विटनंतर राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

### व्लादिमीर पुतीन यांना हृदयविकाराचा झटका?

**नवी दिल्ली :** रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना हृदयविकाराचा झटका आल्याच्या वृत्ताने खळबळ उडाली होती. रविवारी रात्री नऊच्या सुमारास व्लादिमीर पुतिन हे त्यांच्या बेडरूममध्ये खाली पडलेल्या अवस्थेत आढळून आल्याचं वृत्त एका टेलिग्राम चॅनेलने दिले होते. यावर क्रेमलिनच्या प्रवक्त्यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. रविवारी पुतिन हे बेडरूममध्ये खाली पडलेल्या अवस्थेत आढळून आले. जमिनीवर कोसळण्यापूर्वी पुतिन यांनी जेवणाच्या टेबलवरील काही वस्तू फरशीवर पाडल्या. या आवाजामुळे सुरक्षा रक्षकांनी बेडरूममध्ये धाव घेतली. पुतिन यांच्यावर सध्या विशेष अतिदक्षता विभागात उपचार केले जात आहेत, अशी माहिती टेलिग्राम चॅनेल जनरल 'एसव्हीआर'ने दिली होती.

### 'तर मोदी आणि मोहन भागवतांना तुरुंगात पाठवू'



**अकोला :** मोहन भागवतांचे भाषण म्हणजे चोराच्या मनातले चांदणे... आपल्या हातात सत्ता आल्यास आपण नरेंद्र मोदी आणि भागवतांना जेलमध्ये टाकू, असे वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. डॉ. भागवत यांनी २०२४ च्या निवडणुकीसाठी लोकांना भडकावून मत घेतले जाण्याची शक्यता वर्तवली आहे. भागवतांच्या याच भाषणावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी जोरदार टीका केली आहे. मोहन भागवतांचे भाषण म्हणजे चोराच्या मनात चांदणे असल्याची टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. आपल्याला सत्ता मिळाली तर आपण मोहन भागवत आणि नरेंद्र मोदी यांना तुरुंगात पाठवू, असेही यावेळी प्रकाश आंबेडकर म्हणाले.



### शंकर महादेवन, अभिनेत्री प्राजक्ता माळी रेशीमबागेत

**मुंबई :** अभिनेत्री प्राजक्ता माळी तिच्या सोशल मीडियावरील नव्या पोस्टमुळे चर्चेत आली आहे. मंगळवारी दसऱ्यानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी सोहळ्यासाठी प्राजक्ताने हजेरी लावली होती. नागपुरातील रेशीमबाग येथे हा सोहळा पार पडला. यावेळी या आरएसएसच्या दसरा मेळाव्याचे व्हिडिओ, कार्यक्रम पत्रिका प्राजक्ताने शेअर केली आहे.

# लिव्ह इन रिलेशनशिप म्हणजे फक्त टाईमपास

## अस्थिर नात्यांविषयी न्यायालयाचे ताशेरे



**नवी दिल्ली**

लिव्ह इन रिलेशनशिपबाबत अलहाबाद उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. एका आंतरधर्मिय जोडप्याने पोलीस संरक्षण मागितले होते. ती याचिका फेटाळून लावत लिव्ह इन रिलेशनशिप हे एक अस्थिर आणि टाईमपास नाते आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने लिव्ह इन रिलेशनशिपला मान्यता दिली असली तरीही अशी नाते प्रामाणिकपणापेक्षाही एकमेकांच्या आकर्षणातून तयार होतात, असे उच्च न्यायालायने म्हटले. तसेच, अशी नाती अत्यंत नाजूक आणि अस्थिरही असतात, असं म्हणत उच्च न्यायालयाने लिव्ह इन रिलेशनशिपबाबत ताशेरे ओढले आहेत.

न्यायमूर्ती राहुल चतुर्वेदी आणि न्यायमूर्ती मोहम्मद अजहर हुसैन इदरीसी यांच्या खंडपीठाने सांगितले की, दोन महिन्यांच्या ओळखीतून २०-२२ वर्षांचे तरुण अशा अस्थिर नात्यांविषयी विचार करू शकतात असं कोर्ट ग्राह्य धरू शकत नाही. आयुष्यात समस्या आणि संघर्ष येतात. त्यामुळे याला फुलांची मखमली चादर समजण्याची चूक तरुणांनी करू नये.

### नेमके प्रकरण काय?

उत्तर प्रदेशच्या मथुरा जिल्ह्यातील रिफायनरी ठाणे क्षेत्रातील २२ वर्षांची एक हिंदू मुलगी घर सोडून मुस्लीम समाजातील तरुणासोबत लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहायला लागली. याप्रकरणी तरुणीच्या घरच्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. मुस्लीम तरुणाने आमच्या मुलीला पळवले आहे, अशी तक्रार तरुणीच्या आई-वडिलांनी केली. त्यामुळे ही तक्रार रद्द करण्याच्या उद्देशाने हे जोडपे अलाहाबाद हायकोर्टात पोहोचले. माझ्या कुटुंबापासून आमच्या जीवाला धोका आहे, त्यामुळे त्यांच्यापासून आम्हाला पोलीस संरक्षण हवे, असे तरुणीने तिच्या याचिकेत म्हटले. तसेच, तरुणी सज्ञान असून ती तिच्या जोडीदाराच्या निवडीबाबत निर्णय घेऊ शकते, असे तरुणीच्या वकिलाने कोर्टात सांगितले. परंतु, अलाहाबाद हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे.

# अरेरे, तुम्ही काय गप्प बसू नका..

## मनोज जरांगे-पाटलांचा आता धनगर आरक्षणालाही पाठिंबा

**सुराज्य/अहमदनगर**

मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटलेला असताना धनगर समाजानेही आरक्षणाचा मुद्दा उचलून धरला आहे. मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे पाटलांनी सरकारला दिलेल्या अल्टिमेटमचा आजचा शेवटचा दिवस आहे. शेवटच्या दिवशीच त्यांनी धनगर समाजालाही पेटून उठण्याचं आवाहन केलं आहे. तसंच, धनगर आरक्षणासाठी लागणारी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. चौंडी येथे आयोजित केलेल्या धनगर मेळावा कार्यक्रमात मनोज जरांगे पाटील बोलत होते.



जरांगे पाटील म्हणाले की, डोंगरात, दरीत, पाण्यात, पावसात तुम्ही मेंढरं चारता. तुमचं स्वप्न एकच आहे की, माझ्या वाट्याला कष्ट आले ते माझ्या लेकराच्या वाट्याला नकोत. पण कोणाचंच स्वप्न पूर्ण होत नाही. आरक्षणापायी स्वप्न भंग होतात. रात्रंदिवस कमावलेला पैसा वाया जातो. आमचा मराठा समाजही उस तोडायचा. रात्री अपरात्री शेतात पाणी द्यायला जायचा. स्वप्न एकच आमच्या वाट्याला जे कष्ट आले ते लेकराच्या वाट्याला येऊ नयेत. म्हणून आरक्षण पाहिजे. म्हणजे आपल्या दोघांचे (मराठा-धनगर) दुखणे एकच आहे.

पडलेले सरकार (विरोधक) म्हणते की मी निवडून आलो की लगेच आरक्षण देतो, मग पडलेले निवडून आले की दुसरे पडलेले म्हणते की चारच दिवसांत देतो फक्त मोगलाई येऊदे. अरे तुमची सत्ता येते केव्हा? आम्हाला किती दिवस फिरवणार? ही जागृकता आपल्यात येणे महत्त्वाचे आहे.

धनगाराच्या शेवटच्या माणसापर्यंत आरक्षण अगोदर सांगावं लागेल. जर एकदा धनगाराची लाट उसळली तर या देशातील कोणतीच शक्ती आरक्षण देण्यापासून वाचवू शकणार नाही. पण ती कसरत तुम्हाला करावी लागणार. त्याशिवाय समाजाला न्याय मिळणार नाही, असा सल्लाही दिला.

### सरकार बोलण्यास भाग पाडते

मनोज जरांगे पाटील यांनी धनगर आरक्षणाविषयी बोलतानाही त्यांनी एक धक्कादायक विधान केले आहे. मराठा समाजाला आरक्षण द्यावे म्हणून ओबीसी समाजाची कोणतीही हरकत नाही मात्र त्यांचे नेते बोलतात. त्यांचीही बोलण्याची इच्छाही नाही परंतु सरकार त्यांना बोलण्यास भाग पाडत असल्याचा त्यांनी गंभीर टीकाही केली आहे.

### समितीलाही वेळ नाही

मनोज जरांगे पाटील यांनी आज सांगितले की, मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत सरकारने दिलेली मुदत आता संपली आहे. त्यातच आरक्षणाबाबत जी समिती नेमली होती. त्या समितीनेही वेळ मागितला होता. मात्र त्यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला वेळ देण्यास नकार दिला आहे. तसेच सरकारला आता एक मिनिटही वेळ देणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

# रुग्णांना सर्वोत्तम सेवा देणारे पडवळ बंधू

## डॉ. शुक्ला यांचे प्रतिपादन : बार्शीतील भगवंत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचा लोकार्पण

**सुराज्य/बार्शी**



जन्मभूमीलाच कर्मभूमी बनवून ग्रामीण रुग्णांना राष्ट्रीय दर्जाच्या सुविधा देण्याचे काम डॉ. पडवळ बंधूंनी भगवंत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल च्या माध्यमातून केले आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रीय मानसिक आरोग्य व मेंदू विकार विभाग बंगळुरूचे अध्यक्ष व सुविख्यात शल्यकर्मी डॉ. धवल शुक्ला यांनी काढले.

येथील ख्यातनाम मेंदू विकार शल्यकर्मी डॉ.अमित पडवळ, प्रख्यात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. सुमित पडवळ यांनी काढलेल्या भगवंत सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व लेव्हल वन ट्रॉमा युनिट लोकार्पण सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी फोर्टिस इन्स्टिट्यूट बंगळुरुचे अध्यक्ष डॉ. विवेक जावळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी आ. राजेंद्र राऊत, माजी मंत्री दिलीप सोपल, डॉ बी वाय यादव, डॉ.राजेंद्र दास, असिफ तांबोळी, रमेश पाटील,ज्येष्ठ पत्रकार राजा माने, विश्वास बारबोले उपस्थित होते.

प्रस्ताविकामध्ये डॉ.अमित पडवळ म्हणाले, अत्याधुनिक सुविधा असणारे बार्शीचे हे हॉस्पिटल गरीब रुग्णांसाठी धर्मादाय निवास, भोजन व्यवस्था उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले.

यावेळी आ. राऊत म्हणाले, कोरोना काळात बार्शीतील डॉक्टरांनी हजारो रुग्णांचे प्राण वाचवले. पडवळ बंधूंनी बार्शीमध्ये हे हॉस्पिटल उभारून ग्रामीण रुग्णांसाठी योग्य सेवा बजावण्याचा निर्णय घेतला. यावेळी माजी मंत्री सोपल म्हणाले, स्वतःच्या हिमतीवर अंतरराष्ट्रीय दर्जाचे उपचार सुविधा असणारे हॉस्पिटल काढून पडवळ बंधुंनी खऱ्या अर्थाने सिमोल्लंघन करण्याचे काम केले.

यावेळी डॉ. संजय अंधारे, असलम तांबोळी, विजयकुमार केसकर,दत्तात्रय पडवळ, सुनंदा पडवळ, सुषमा पडवळ, मंजुश्री पडवळ उपस्थित होते. सूत्रसंचालन नीता देव यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. सुमित पडवळ यांनी केले.

# भर सभेत पंकजा मुंडेंचा सवाल

## देश भ्रष्टाचारमुक्त झाला का?



**सुराज्य/बीड**

भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांचा भगवान भक्तीगड येथे 'दसरा मेळावा' पार पडला. या मेळाव्यातून पंकजा मुंडे यांनी चौफेर टीका केली. २०२४ च्या निवडणुकीबाबतही सूचक विधान त्यांनी केले. दरम्यान, पंकजा मुंडे यांनी भर सभेत 'देश भ्रष्टाचारमुक्त झाला का?', असा सवालही विचारला आहे. त्यामुळे त्यांच्या बोलण्याचा रोख नेमका कुणाकडे होता? यावरून आता राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

यावेळी पंकजा मुंडे म्हणाल्या, राज्यात शेतकऱ्यांना न्याय देणारे, महिलांना सन्मान देणारे सरकार हवे आहे. राज्यात जाती-जातींमध्ये आतंक पसरला आहे. याला विराम देऊन प्रत्येकाला कुशीत घेऊन कुरवाळणाऱ्या नेतृत्वाची राज्याला गरज आहे. जाती-पातीच्या भिंती तोडून राजकारण करण्याची गरज आहे. देश भ्रष्टाचार मुक्त झाला का? भ्रष्टाचारातून आपण वाचलो का? तुमच्या मताला काही किंमत आहे का? तुम्ही कुणाला मत द्याल आणि सरकार कुणाचे येईल, यावर तुमचे काहीही नियंत्रण नाही. राज्यात आता स्थिरता हवी आहे, या स्थिरतेसाठी मी प्रयत्न करणार आहे.

### गोली का जबाब गोली से

गोपीनाथ मुंडेसाहेबांनी जेव्हा अंडरवर्ल्डशी सामना केला होता. तेव्हा त्यांनी पोलिसांना सांगितले होते, गोली का जबाब गोली से दो'. कारण अंडरवर्ल्डचे लोक पोलिसांना गोळ्या घालत असतील तर पोलीसही त्यांना गोळ्या घालू शकतात, हे धारिष्ट मुंडेसाहेबांनी दाखवले.

### आता असले काहीही चालणार नाही

राजकारणामध्ये मी नेत्या, ताई, ताईसाहेबांपासून आता आईच्या भूमिकेत आहे. त्यामुळे माझ्या लोकांचे हित बघणे, त्यांना न्याय देणे, हे माझे कर्तव्य आहे. कुणा दुसऱ्यांचे हडपून खाणे, हे माझे परम कर्तव्य नाही. इकडची जागा लढा.. तिकडची जागा लढा.. प्रीतमताई घरी बसतील.. तुम्ही लढा.. आता असले काहीही चालणार नाही. कारण मी कुणाच्या मेहनतीचे खाणार नाही. तुम्ही म्हणाला तर ऊस तोडायला जाईन, कापूस वेचायला जाईन, पण स्वाभिमान गहाण टाकू शकणार नाही, अशी भूमिका मांडली आहे.

# बार्शीत आमदार राजेंद्र राऊत यांचा नागरी सत्कार

**सुराज्य/बार्शी**



बार्शी तालुक्याच्या विकासासाठी आमदार राजेंद्र राऊत यांनी सुमारे दोन हजार कोटींचा निधी आणला. आज सर्वच क्षेत्रात बार्शी तालुका प्रगतीपथावर आहे. आ. राऊत यांच्या माध्यमातून बार्शी तालुक्यासह जिल्ह्याला निधी मिळत राहो, अशी सदिच्छा व्यक्त करत भविष्यात दुष्काळावर मात करण्यासाठी कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन आ.रणजीतसिंह मोहिते-पाटील यांनी कले. ते आ. राजेंद्र राऊत यांच्या नागरी सत्कार कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी आमदार राजेंद्र राऊत, आ.राणा जगजीतसिंह पाटील, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.राम सातपुते, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, असिफ तांबोळी, विजय राऊत, बाजार समितीचे सभापती रणवीर राऊत, संतोष निंबाळकर, विलास रेणके, कुंडलिक गायकवाड, दिलीप गांधी उपस्थित होते.

यावेळी राज-विजय क्रीडा व सांस्कृतिक शैक्षणिक मंडळ व आरसीसी क्रिकेट क्लब यांच्यावतीने चांदीची तलवार व गदा देऊन आ. राजेंद्र राऊत यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी राणा जगजीतसिंह पाटील म्हणाले, कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेमुळे १२ लाख एकर जमीन ओलिताखाली येईल. त्यामुळे आम्ही पूर्ण ताकदीने कृष्णा-भीमा स्थिरीकरणाचा प्रकल्प पुढे नेऊ. भगवंत तीर्थ क्षेत्र विकास आराखडा मार्गी लागणार आहे. आ. सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, विकासाच्या अनुषंगाने राजाभाऊंच्या डोक्यात सदैव बार्शीचा विचार असतो असे म्हटले.

आ. राम सातपुते यांनीही मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना आ. राऊत म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी बार्शी तालुक्याला विकास निधी कमी पडू दिला नाही. उपसा सिंचन, साठवण तलाव, बंधारे, यामुळे तालुका हिरवागार होणार आहे. जलजीवन मिशनमधून ग्रामीण भागात ९८ गावाचा समवेश झाला आहे. तसेच उजनी समांतर योजनेतून २९६ कोटींचा मंजुर प्रस्ताव केंद्राकडे आहे. एमआयडीसीचे काम प्रगती पथावर आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राऊत यांना वाढदिवसानिमित्त भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन केशव घोगरे यांनी केले.

# ओंकार कारखाना परिवाराने शेतकऱ्यांच्या हिताला दिले प्राधान्य

**सुराज्य/पिलीव**



माळशिरस तालुक्यातील ओंकार साखर कारखाना चांदापुरी युनिट-एकचा चौथा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, रेखाताई बोत्रे-पाटील, चांदापुरीचे सरपंच जयवंत सूळ, नंदाताई सूळ यांच्या हस्ते झाला.

- चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांचे प्रतिपादन
- चौथा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा उत्साहात

यावेळी बोलताना चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील म्हणाले, ओंकार साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले आहे. जे शक्य ते शेतकऱ्यांना देऊ. या कारखान्याला कोणतेही उप पदार्थ निर्मिती प्रकल्प नसताना आपण शेतकऱ्यांना वेळेत व समाधानकारक दर दिला आहे. आपण जाहीर केलेला दर आजपर्यंत शेतकऱ्यांना दिला आहे. ओंकार साखर कारखान्याच्यावतीने ऊस उत्पादक शेतकरी व कामगारांना दिवाळीसाठी मोफत साखर दिल्याबद्दल सर्वाच्यावतीने रामचंद्र मगर यांनी ओंकार परिवाराचे आभार मानले. माजी सरपंच भजनदास चोरमले यांनी ओंकार साखर कारखान्यामुळे चांदापुरी गावाची प्रगती झाली असून, कारखान्याला गावाचे पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी संचालक प्रशांत बोत्रे-पाटील, ओमराजे बोत्रे-पाटील, जनरल मॅनेजर भीमराव वायमोड, चीफ इंजिनिअर तानाजीराव देवकते, केन मॅनेजर शरद देवकर, चांदापुरी, निमगाव, तरंगफळ, पिलीव, पठाणवस्ती, कुसमो, झंजेवस्ती, ऊस उत्पादक शेतकरी, ऊस वाहतुकदार, कारखान्याचे अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते. आभारप्रदर्शन विष्णू गोरे यांनी केले.

### येत्या डिसेंबरमध्ये उपपदार्थ निर्मिती प्रकल्पात वाढ

येत्या डिसेंबर महिन्यात उपपदार्थ निर्मित प्रकल्प आणि गाळप क्षमतेत वाढ होणार आहे. या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना जास्तीत दर देण्याबाबत ओंकार परिवार कटीबद्ध आहे, अशी माहिती चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी दिली.

# अल्पवयीन मुलीवर दुष्कर्म

**सोलापूर :** एका साडेचौदा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर दुष्कर्म केल्याप्रकरणी कल्लप्पा ऊर्फ रंगा कामते (वय-४९) याला पोलिसांनी अटक केली

पीडित मुलगी ही एका गावात राहते. तीने नववीतून शाळा सोडल्याने ती शेळ्या राखण्याचे काम करते. त्यातून तिची आरोपीशी ओळख झाली. आरोपीने तिला पैसे देण्याचे आमिष दाखवून तुझ्या वडिलाला मारून टाकण्याची धमकी देऊन तिच्यावर वारंवार दुष्कर्म केले. मासिक पाळी न आल्याने शासकीय रुग्णालयात तिची तपासणी केल्यानंतर ती गर्भवती असल्याचे समोर आले. तिने आरोपीने धमकी दिल्याचे सांगितले. आरोपीला अटक केली आहे. तपास सपोनि जाधव करीत आहेत.



# 'विठ्ठल'ची पहिली उचल २५५० रुपये जाहीर

**सुराज्य/पंढरपूर**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा ४२ वा गळीत हंगामाचा शुभारंभ विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर झाला. मनोरमा बँकेचे अध्यक्ष श्रीकांत मोरे व त्यांच्या पत्नी शोभा मोरे, अविनाश महागांवकर, जकराया शुगरचे अध्यक्ष बिराप्पा जाधव, हरी पाटील, खंडू सुरवसे, सुखदेव हाके, औदूंबर पोरे, वसंत वाघ, दगडू भोसले, बब्रुवान भोसले यांच्या हस्ते उद्घाटनाने शुभारंभ झाला.

यावेळी संतोष नेहतराव, धनंजय कोताळकर, प्रताप गंगेकर, महादेव धोत्रे, निलेश आंबरे, लखन चौगुले, प्रथमेश पाटील, चंद्रशेखर कोंडुभैरी, सुधीर धुमाळ, नागेश गंगेकर, अरुण कोळी, बालाजी मलपे, संतोष पवार, शिवाजी मस्के, क्रषीकेश भालेराव, काका पवार, आदित्य फत्तेपूरकर उपस्थित होते.

यावेळी कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील म्हणाले, यंदाच्या हंगामामध्ये गळीतास येणाऱ्या उसास प्र.मे.टन २५५० रुपयांची पहिली उचल देणार असल्याचे जाहीर केले. यावर्षी कारखान्याकडे ३७ हजार एकर उसाची नोंद झाली आहे. कारखाना आर्थिक अडचणीत असताना सुध्दा कर्मचाऱ्यांना १५ दिवसांचा पगार, बोनस व १९ दिवसांचा पगार बक्षीस म्हणून देणार आहे. यावेळी श्रीकांत मोरे म्हणाले, अध्यक्ष अभिजीत पाटील हे पाच साखर कारखाने चालवित असल्यामुळे त्यांच्या अनुभव दांडगा असून, तो प्रगतीपथावर पोहोचवला आहे.

यावेळी डॉ.बी.पी.रोंगे, उपाध्यक्षा प्रेमलता रोंगे, संभाजी भोसले, कालिदास पाटील, दीनकर चव्हाण, सुरेश भुसे, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, डी.आर.गायकवाड,सी.एस.पाटील, अमर पाटील उपस्थित होते.

# अदा शर्मा यांनी केले 'सुराज्य' चे भरभरून कौतुक

सुराज्य/सोलापूर

**बहुचर्चित 'द केरला स्टोरी' चित्रपटाने चित्रपटगृहाच्या खिडकीवर गर्दी खेचण्यात प्रचंड यश मिळवले. यशात टीममधील अनेकांचे योगदान असतं, हे त्रिकालाबाधित सत्य असतं. 'द केरला स्टोरी' ने एका अभिनेत्रीला प्रत्येकाच्या ओठावर आणलं, ते नांव आहे, अदा शर्मा... 'दैनिक सुराज्य' च्या दि. १४ मे २०२३ च्या अंकात 'द केरला स्टोरी' जे कव्हरेज दिलं होतं, त्याची फ्रेम दैनिक सुराज्यचे प्रतिनिधी रोहन नंदाने यांनी सस्नेह दिल्यावर अदा शर्मा यांनी द केरला स्टोरीवर प्रसिद्ध झालेल्या विशेष वृत्ताबरोबर 'सुराज्य' चे भरभरून कौतुक करताना विशेष आभारदेखील मानले.**



## 'द केरला स्टोरी' वर प्रसिद्ध झालेल्या वृत्ताबद्दल मानले आभार

### माझ्यासाठी अनमोल आठवण, भेट माझ्या कायम लक्षात राहणारी

यापूर्वी 'दैनिक सुराज्य' ने १४ मे २०२३ च्या अंकात 'द केरला स्टोरी' जे कव्हरेज दिलं होतं, त्याची फ्रेम दिल्यानंतर शेवटी अदा शर्मा म्हणाल्या की,ही फ्रेम फक्त फ्रेम नाही तर चहात्यांचं प्रेम आणि माझ्यासाठी एक अनमोल आठवण आणि अविस्मरणीय भेट असून माझ्या कायम लक्षात राहणारी माझ्या कामाची पावती आहे, असे म्हणत विशेष वृत्ताबरोबर 'सुराज्य' चं भरभरून कौतुक करत विशेष आभार ही मानले.

१९९२ या हॉरर सिनेमातून बॉलिवूड डेब्यू करणारी अदा शर्मा हल्ली 'द केरला स्टोरी' या सिनेमामुळे खूपच चर्चेत आली. सोशल मीडियावर तिच्या अभिनयाचे आणि 'द केरला स्टोरी'मधील कामाचे कौतुक केले जाते आहे. द केरळा स्टोरी हिट ठरत असताना अदा ही सोशल मीडियावर अधिक सक्रीय झाल्याचे आहे. 'द केरला स्टोरी' प्रदर्शित झाल्यावर त्यावर आरोपाच्या फैरी झडत असताना या चित्रपटाच्या कथेचं आणि चित्रपटाचं समर्थन करणारा वर्ग ही मोठ्या संख्येने रस्त्यावर आला. 'द केरला स्टोरी' चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यावर समर्थकांनी शोच्या शो बुकिंग केले.त्यांच्या समर्थकांनी तो अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी त्याची 'किंमत' ही मोजली. अशा एक ना अनेक कारणांनी हा चित्रपट गाजला. या सिनेमाच्या बाबतीत तिने विविध पोस्ट शेअर केल्या आहेत. या आधीही अदाने अनेकदा शाळेत शिकलेल्या मराठी कवितांचे व्हिडिओ इन्स्टाग्रामवर शेअर केले होते, जे तुफान व्हायरल झाले. अभिनेत्री शाळेत असताना मराठी शिकली होती. तिचे या भाषेवरील प्रेम आजही कायम आहे. त्यामुळे मराठी भाषिक प्रेक्षकांचे विशेष लक्ष अदाच्या या पोस्टने वेधून घेतले आहे.





**सोलापूर : शहर व जिल्ह्यात मंगळवारी मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात दसरा महोत्सव साजरा करण्यात आला. शहरातील अनेक नवरात्रोत्सव मंडळांनी मिरवणुकीने सिम्मोलंघन केले. शहरातील श्री रुपा भवानीमाता, तेली समाजाची अंबाबाई, जगदंबा देवस्थान, भावसार समाज श्री हिंगुलाबिका देवस्थान, गोंधळी समाजाचे इंद्रभवानी देवस्थान आदी मंडळ मिरवणुकीत सहभागी झाले होते. यंदाच्या मिरवणुकीत तीस ते चाळीस मंडळे सहभागी झाले होते. यानिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन झाले. अनेक मंडळांनी काठी, पालखी, ढोल ताशा, लेझीम पथकासह विविध देखावे सादर केले.**







## श्री हिंगलाज मातेची उत्साहात मिरवणूक

सुराज्य/सोलापूर

भावसार समाजाची कुलस्वामिनी, समस्त भक्तांना पावणारी श्री हिंगुलांबिका देवी देवस्थान ट्रस्ट व उत्सव समितीच्यावतीने हिंदू धर्म रूढीनुसार मंगळवारी पहाटे साडेपाच वाजता विनायक धोंडिबा चिंचरे यांच्या हस्ते श्री देवी मातेस महाभिषेक करण्यात आला. देवीला वस्त्र, सुवर्ण अलंकार, पुष्पहार अर्पण केल्यानंतर आरती करण्यात आली.

सिम्मोलंघनानंतर मंदिरात राजेश नागेश क्षीरसागर यांच्या परिवारासह महाआरती झाली. उपस्थितांना महाप्रसाद देण्यात आले. यावेळी सुर्यकांत महिंद्रकर, यल्लप्पा महिंद्रकर, श्रीकांत अंबुरे, दत्तात्रय पुकाळे, समाजाचे अध्यक्ष राजकुमार हंचाटे, उत्सव अध्यक्ष किसन गर्जे, विजय पुकाळे, बापू ढगे, बाळासाहेब खमितकर, यश महिंद्रकर, सागर ढगे, रूपेश बेळमकर, सुहास क्षीरसागर, संजय पतंगे, शुभम माळवदकर, सुनील क्षीरसागर, सुर्यकांत खमितकर, संतोष पिसे, गणेश वन्नारोटे, आश्विन डोईजोडे, अभिषेक रंपुरे यांच्यासह आदी सहभागी झाले होते.

# शमीवृक्षाजवळ लोटला जनसागर; सीमोल्लंघनाने नवरात्रौत्सवाची सांगता

## 'आई राजा उदो- उदो'च्या जयघोषात निघाल्या शक्ती देवीच्या मिरवणुका



सुराज्य/सोलापूर

सीमोल्लंघनाने नवरात्र उत्सवाची सांगता झाली. 'आई राजा उदो-उदो 'च्या प्रचंड जयघोषात मानाच्या पालख्यांसह शक्तीदेवीच्या मिरवणूका निघाल्या. मिरवणुकीत शहरातील विविध देवस्थानच्या मानाच्या नंदीध्वज पालख्या-छबिन्यासह सार्वजनिक मंडळाच्या श्रीदेवी मूर्तींची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

शमी वृक्षाजवळ सीमोल्लंघनासाठी जनसागर लोटला होता. ग्रामदैवत श्री रूपाभवानी मातेच्या पालखीचे व बलिदान चौकातील अग्रमणी या मंडळाच्या अष्टभुजा महिषासूरमर्दिनीच्या मुर्तीस पुष्पहार अर्पण करून आरतीकरून मिरवणुकीस सुरूवात झाली.

सहभागी मंडळांनी लेझीमचा बहरदार खेळ सादर केला. त्याशिवाय काही मंडळांनी ढोल, ताशा पथक, झांज पथक आदी विविध वाद्यांच्या ताफ्यासह सहभागी झाले होते.

### शिवराज्याभिषेक सोहळा देखावा

माजी सभागृह नेते संजय कोळी यांच्या मंडळाने ३५० वर्षांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या देखाव्यासह मिरवणुकीत सहभागी झाले होते. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी लेझीमचा खेळ सादर केला. काही मंडळांनी फुलांची सजावट केली होती. काही मंडळांनी पौराणिक देखावे सादर केले होते.

### प्रथेनुसार जोशी परिवाराकडून पूजन

दिवसभरात शहवासीयांनी आराध्य दैवत माता रुपाभवानीचे दर्शन घेऊन, पार्क मैदानातील शमीच्या वृक्षाचं पूजन आणि दर्शनासाठी सायंकाळी भक्तगणांनी चांगलीचं गर्दी केली होती. सहकुटुंब, सहपरिवार पार्कवर सीमोल्लंघनासाठी उपस्थित असल्याने भक्तीसागराला जणू उधाण आले होते. प्रथा-परंपरेनुसार समस्त जोशी परिवारांच्यावतीने शमी वृक्षाचे पूजन करण्यात आले. सकाळी मंगलमय वातावरणात शमीच्या वृक्षाचं पूजन आणि आरती झाल्यानंतर सकाळपासून मोठी गर्दी दिसून आली.

मिरवणुकीच्या शेवटी मानाची मेकॅनिक चौकातील श्री आझाद हिंद चौक मंडळाची देवीमुर्ती विराजमान होती. मानाची अग्रगण्य जय भवानी मातेस अध्यक्ष प्रशांत बाबर सचिव दत्तात्रय मेनकुदळे, कार्याध्यक्ष प्रशांत कांबळे,विश्वस्त सुनील रसाळे, दिलीप कोल्हे आदींच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आरती करून मिरवणूक सुरू झाली. यावेळी अंबादास गुत्तीकोंडा,शिवानंद सावळगी, विजय पुकाळे, अशोक कलशेट्टी, मल्लिनाथ याळगी, आशिष उपाध्ये, निलेश शिंदे, गणेश चिंचोळी, चक्रपाणी गज्जम आदी उपस्थित होते.

# मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने सोलापुरात रावण पुतळा दहन

## कोंडी, संभाजी महाराज चौकात मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांचा नोंदवला निषेध

सुराज्य/सोलापूर



सोलापुरात मराठा समजाला आरक्षण देण्यास टाळाटाळ, विरोध करणाऱ्या सत्ताधारी, विरोधीपक्षाच्या एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, शरद पवार, अजित पवार, उध्दव ठाकरे, संजय राऊत, छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार, आंबदास दानवे, गुनरत्न सदार्वते, चंद्रकांत पाटील आदींचा ११ तोंडी रावणांचा पुतळा दहन करण्यात आला.

मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज चौक आणि कोंडी येथे हा रावण पुतळा दहन कार्यक्रम पार पडला. गेल्या तीन दिवसात दोन समाज बांधवांनी मराठा आरक्षणासाठी आपले बलिदान दिल आहेत. आतापर्यंत मराठा सामाजातील ५० बांधवांनी मराठा आरक्षणासाठी आपले बलिदान दिले. मनोज जरांगे-पाटील यांनी पुन्हा आंदोलनाची तयारी सुरु केली आहे. तरीदेखील शासन आरक्षणासाठी वेळ काढू धोरण स्विकारत आहे. त्याशिवाय सत्ता आणि विरोधीपक्षातील काही लोक उघड उघड आरक्षणला विरोध करत आहेत. त्यांच्या निषेर्धात रावण पुतळा दहन आंदोलन करण्यात आल्याचे संयोजन राम जाधव यांनी सांगितले.

या आंदोलनात समन्वयक राम जाधव, मारुती सुरवसे, प्रकाश जाधव, राज सरडे, माउली चटके, ओम आंदेली, जंयत जगदाळे, अक्षय गुंड, सागर धावणे, संभा गळके, पृथ्वीराज राजपूत, शुभम लामकाने आदी समाजबांधव सहभागी झाले होते.

### कोंडीमध्ये २० फुटी रावण पुतळा दहन..

सकल मराठा समाजाच्यावतीने मौजे कोंडी गावात देखील मनोज जरांगे-पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी तीस दिवसांपासून साखळी उपोषण सुरुआहे. सर्वपक्षीय बैठक घेऊन सर्व राजकीय पक्षातील पदाधिकारी आमदार, खासदार यांना गावबंदी करण्यात आली आहे. तसा फलक लावण्यात आला आहे. तर मंगळवारी रात्री सत्ताधारी विरोधीपक्षातील नेत्यांची प्रतिमा असलेल्या २० फूटी रावण पुतळ्याचे दहन रात्री करण्यात आले.

